अस्सल सोलापुरी

सुराज्य
सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. २८ मे २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २३८ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

आषाढी वारीसाठी बैठकांचा फार्स, वारकरी सोसतायेत तोच तोच त्रास

● प्रश्न सोडवून मार्ग सुकर करा; वैष्णवांची प्रशासनाला आर्त हाक

सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्याला आषाढी वारीचे वेध लागले आहेत. शासन पातळीवर बैठकांचा धडाका सुरू असून कोट्यावधींच्या निधीची बरसातही केली जात आहे पण नेमेचि येतो पावसाळा म्हणतात, त्याप्रमाणे यंदाच्याही वारीने दुःख तेच असणार आहे.पालखी मार्गाचा विकास होत असला तरी शेकडो झाडांची कत्तल करण्यात आली.नव्याने झाली लावली नाहीत.त्यामुळे यंदाचीही वारी उन्हाचे चटके खातच वारकऱ्यांना करावी लागणार आहे. अतिक्रमणाचा प्रश्नही गंभीर आहे. पालख्यांचे जिल्ह्यात आगमन होण्याच्या आत नागरी सुविधा देण्याची मागणी वारकऱ्यांमधून होत आहे.

आषाढी एकादशी सोहळ्यासाठी जवळपास १० ते १२ लाखांचा समाज संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम पालखी सोहळ्याच्या माध्यमातून पायी चालत पंढरपूरला येत असतो. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या पालखी मार्गाचे रुंदीकरण करत त्याचे रुपडे पालटले असले तरी गेल्या वर्षीपासून वारकरी संप्रदाय मागणी करीत असलेल्या सध्या सुविधा देखील शासन-प्रशासन देऊ शकले नसल्याचे वास्तव आहे. पालखी सोहळ्याची जवळपास सव्वा दोनशे वर्षांची परंपरा आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पालखीसोबत चालणाऱ्यांची संख्या कित्येक पटीने वाढत जाऊ लागल्याने अडचणी देखील वाढत चालल्या आहेत. यासाठीच केंद्र सरकारने अद्ययावत सहा पदरी पालखी मार्ग केल्याने गर्दीची अडचण संपली असली तरी हे मार्ग बनवताना शेकडो झाडांची कत्तल करणाऱ्या ठेकेदारांनी मार्गाशेजारी झाडेच न लावल्याने वारकऱ्यांना दिवसभरात निवाऱ्यासाठी उभारायला सावलीच राहिलेली नाही. याबाबत गेल्यावर्षी देखील वारकरी संप्रदायाने वृक्षारोपणाबाबत मागणी करूनही प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले. यामुळे यंदा उन्हात भाजत वारी करावी लागणार आहे.

पालखी मार्गावर दिशादर्शक फलक लावण्याची मागणी

पालखी मार्गाचे रुंदीकरण करताना ठिकठिकाणी आलेले उड्डाणपूल, बाह्यवळण रस्ते करण्यात आल्याने वारकऱ्यांना आपल्या न्याहारीचे, भोजनाचे, विसाव्याचे आणि मुक्कामाचे ठिकाण शोधावे लागत आहे. रास्ता रुंदीकरणात मोठ्या प्रमाणात कडेच्या जमिनी गेल्याने जुन्या पारंपरिक खुणा उरल्या नाहीत. यामुळे वारी सोहळ्यातील पारंपरिक महत्त्वाची ठिकाणे, रिंगण सोहळे आणि वारीतील इतर उपक्रम लक्षात येण्यासाठी पालखी मार्गावर दिशादर्शक फलक लावण्याची मागणी गेल्या वर्षीपासून सुरु आहे. मात्र याबाबत देखील बांधकाम विभागाचा उदासीनपणा वारकऱ्यांचा त्रास वाढवत आहे. पालखी मार्ग जर पालख्यांसाठी केला असेल तर या मार्गावर ठिकठिकाणी पालख्यांची दिशादर्शक नामफलक लावण्यात अडचण काय असा सवाल माऊली पालखी सोहळ्यातील ज्येष्ठ ज्ञानेश्वर महाराज जळगावकर यांनी विचारला आहे.

सर्व जुन्या खुणा नष्ट

श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गाचे चौपदरीकरण झाल्याने पालखी मार्गावरील सर्व जुन्या खुणा, माहिती फलक नष्ट झाले आहेत. वारकऱ्यांना गाव, पालखी तळ, विसावा, धावा, भारुड, रिंगण आदी जागा कळाव्यात यासाठी पालखी मार्गावर दिशादर्शक फलक लावावेत अशी मागणी गेल्या वर्षीपासून केली जात आहे. मात्र प्रशासनाला या मूलभूत प्रश्नाशी देणे-घेणे नसल्यासारखे दुर्लक्षित केले जात आहे.

प्रशासनाने कामे उरकण्याची अपेक्षा

आळंदी ते पंढरपूर या पालखी मार्गाचे काम जलदगतीने सुरु आहे. परंतु जेजुरी ते नीरा या रस्त्याचे अद्याप काम सुरु झाले नाही. इथे मोठ्याप्रमाणात गर्दी होते. सोलापूर जिल्ह्यात कामाचा वेग चांगला असला तरी प्रकल्पग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाईची रक्कम न मिळाल्याने काही ठिकाणी अडचणी निर्माण झाल्या आहेत. सोलापूर जिल्हा स्वागत हे जिल्हा सीमेवरच झाले पाहिजे अशी मागणी असून सदाशिवनगर येथील रिंगण सोहळा, वेळापूर पालखी चौक आणि पालखी तळावरील अतिक्रमण यामुळे सोहळ्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पालखी सोहळे जिल्ह्यात येण्यापूर्वी प्रशासनाने कामे उरकावीत अशी वारकऱ्यांची अपेक्षा आहे.

विनयभंग करत केली ५ लाखांची मागणी; गुन्हा दाखल

सुराज्य/सोलापूर

आजीसोबत चालत जात असलेल्या नातीचा हात ओढून कुठे गेली होती? असे विचारल्याप्रकरणी प्रभाकर गायकवाड याच्यावर विनयभंगाचा गुन्हा दाखल झाला.

याप्रकरणी पीडितेच्या आजीने सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना शनिवारी सकाळी घडली. फिर्यादी व पीडित या भाजी घेऊन घराकडे जात असताना आरोपी हे दुचाकीवरून फिर्यादीजवळ आले. त्यांनी पिडितेचा हात ओढला. शिवाय दोन दिवसात पाच लाख रुपये द्या नाहीतर तुझ्या वडिलांना मोठ्या गुन्ह्यात अडकवितो, माझे मोठ्या लोकांसोबत ओळखी आहेत. आम्हाला पैसे दिले नाही तर तुम्हाला जीव घ्यायला ही आम्ही मागेपुढे पाहणार नाही, अशी धमकी दिली, अशा आशयाची फिर्याद पीडितेच्या आजीने दिली आहे. या फिर्यादीवरून आरोपी प्रभाकर गायकवाड याच्यावर विनयभंगाचा गुन्हा दाखल झाला आहे.

सराईत गुन्हेगार गोविंद राठोड तडीपार

सुराज्य/सोलापूर

चोरी, दरोडा असे गंभीर गुन्हे दाखल असलेल्या सराईत गुन्हेगार गोविंद तोळाराम राठोड (वय-३३,रा. मुळेगाव तांडा, ता.द.सोलापूर, सध्या कल्याण नगर भाग १) याला दोन वर्षांसाठी सोलापूर शहर, जिल्हा व धाराशिव येथून दोन वर्षासाठी तडीपार करण्यात आले आहे. त्याच्यावर विजापूर नाका पोलीस ठाण्यात विविध गंभीर गुन्हे दाखल झाले आहेत.

आगामी काळात विविध जातिधर्मांचे सण-उत्सव, मिरवणुका व महानगरपालिका निवडणुकींच्या दरम्यान सोलापूर शहरात कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये, शहरात कायदा व सुव्यवस्था तसेच शांतता अबाधित राहण्याच्या अनुषंगाने गोविंद राठोड याला तडीपार करण्यात आले आहे. त्याच्यावर विजापूर नाका पोलीस स्टेशन हद्दीत चोरी, दरोडा, मारामारी, गुंडगिरी करणे, दहशत निर्माण करणे, महिलांना लज्जा वाटेल असे कृत्य करणे, अवैध व्यवसाय करणे अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे एकूण ११ गुन्हे दाखल आहेत. यामुळे त्याला २४ मे २०२३ रोजीपासून सोलापूर शहर व जिल्हा, धाराशिव जिल्ह्यातून दोन वर्षांकरिता तडीपार करण्यात आले आहे.

पालघर जिल्हा भूकंपाने हादरला

पालघर : पालघर जिल्ह्यातील डहाणू आणि तलासरी तालुक्यात भूकंपाची श्रृंखला सुरूच आहे, मागील सहा महिन्यांपासून थांबलेली भूकंपाच्या धक्क्यांची मालिका पुन्हा सुरू झाली आहे. शनिवारी (२७ मे) एका पाठोपाठ दोन भूकंपाचे धक्के बसल्याने परिसरातील नागरिकांमध्ये चांगलीच घबराट पसरली आहे. सुदैवाने या भूकंपाची तीव्रता कमी असल्याने कोणतीही जीवितहानी किंवा वित्तहानी झालेली नाही. भूकंपाचे धक्के जाणवताच नागरिक घराबाहेर पडले आणि सुरक्षित ठिकाणी जाऊन थांबले.

भूकंपाच्या धक्क्यांनी मुहूर्त साधला असून पालघर जिल्ह्यातील डहाणू, तलासरी तालुक्यातील काही गावं पुन्हा हादरली आहेत. मागील काही वर्षांपासून डहाणू, तलासरी तालुक्यातील गावांना भूकंपाचे धक्के बसत आहेत. गेल्या सहा महिन्यांपासून भूकंपाचे धक्के थांबले होते. मात्र, शनिवारी लागोपाठ दोन भूकंपाचे धक्के जाणवले. पहिला धक्का सकाळी ५ वाजून १६ मिनिटाला ३.५ रिस्टर स्केलचा, तर ५ वाजून २४ मिनिटांनी जाणवलेल्या दुसऱ्या भूकंपाची तीव्रता ३.३ रिस्टर स्केल एवढी करण्यात आली.

शेतातील वाटेच्या कारणावरून दोन गटात मारहाण

चार महिलासह १० जणांवर गुन्हा

सुराज्य/करमाळा

शेतातील रस्त्याच्या वादातून गिरमकर आणि जाधव यांच्या गटात खोरा, काठी आणि दगडाने झालेल्या मारहाणीत चौघेजण जखमी झाले. ही घटना गुळसडी (ता.करमाळा) येथे शुक्रवारी सकाळच्या सुमारास घडली. जखमीपैकी एकाला सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

या प्रकरणात करमाळ्याच्या पोलिसांनी परस्परविरोधी फिर्याद नोंदवून दोन्ही गटातील ४ महिलासह १० जणांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. शोभा बाळासाहेब गिरमकर (वय ४८ रा. गुळसडी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बालाजी जाधव, त्याचे वडील बाबुराव जाधव, ललित माने, पूजा माने आणि बायडाबाई माने अशा पाच जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. काल सकाळी गिरमकर यांच्या घरातील सर्वजण घराजवळील बोअर मध्ये मोटर सोडण्याचे काम करीत होते. त्यावेळी बालाजी जाधव याने तुम्हीआम्हाला शेतात जाण्यासाठी रस्त्या सोडा. असे सांगितले तेव्हा त्यांनी आम्ही रस्ता देतो त्याच्या बदल्यात दुसरी जागा द्या असे म्हणाले. तेंव्हा आरोपीने दोघांना काठीने मारहाण केली. गावातील लोक भांडण मिटवल्यानंतर वरील सर्व आरोपींनी गिरमकर यांच्या घरावर दगडफेक केली. त्यात काचा फुटून नुकसान झाले. असे गिरमकर यांच्या फिर्यादीत नमूद आहे. तर दुसऱ्या गटातील बालाजी बाबुराव जाधव (वय ३५ रा. गुळसडी) याने दिलेल्या फिर्यादीवरून गुड्ड्या ऊर्फ योगेश गिरमकर, मंगेश गिरमकर, शोभा गिरमकर, बाळासाहेब गिरमकर, आणि कोमल गिरमकर अशा ५ जणाविरुध्द गुन्हा दाखल झाला. बालाजी जाधव आणि त्याचे वडील शेतात निघाले होते. त्यावेळी गिरमकर कुटुंबीयांनी या रस्त्यावरून जायचे नाही . असे म्हणत त्यांना खोऱ्याने मारहाण तर इतराने लाथाबुक्क्याने मारहाण केली. या मारहाणीत दोघेजण जखमी झाले. असे जाधव याच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक मारकड करीत आहेत.

स्वातंत्र्यवीर
विनायक
दामोदर सावकर

यांच्या जयंतीनिमित्त
विनम्र अभिवादन...

तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

सोलापूर : होटगी (ता.दक्षिण सोलापूर) येथील रेल्वे स्टेशन जवळ राहणाऱ्या संदीप शांतमलप्पा इंगळे (वय ३०) याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. काल शुक्रवारी दुपारच्या सुमारास त्याने बेडरूम मधील छताच्या पंख्याला साडीने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून लक्ष्मण (भाऊ) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र तो उपचारापूर्वी मयत झाला.

पाण्याच्या हौदात पडल्याने बालक जखमी

सोलापूर : जनावरांसाठी ठेवलेल्या पाण्याच्या हौदात पडल्याने तीन वर्षाच्या बालक जखमी झाला. ही घटना वडाळा (ता. उत्तर सोलापूर) येथे शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. शिवराज सिद्धेश्वर निकम (वय ३ वर्षे रा. वडाळा) असे जखमीचे नाव आहे. त्याला सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात वडिलांनी दाखल केले असून तो शुध्दीवर आहे. शिवराज खेळता खेळता पाण्याच्या हौदात बुडाला. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

सख्ख्या भावाने केली बहिणीच्या घरात चोरी

सुराज्य/मोहोळ

बहीणीच्या घरी राहायला आलेल्या भावाने रोख रक्कमेसह सोने, चांदीचे दागीने असा तीन लाखांच्या ऐवजावर डल्ला मारला. ही घटना औढी (ता. मोहोळ) येथे घडली.

मोहोळ तालुक्यातील गोकर्णा बाळु घोडके कुटुंबासमवेत राहत असून मोलमजुरी करून उदरनिर्वाह करतात. त्यांच्याकडे घटनेच्या अगोदर एक महिन्यापासून त्यांचा भाऊ अमोल पोपट कांबळे (रा. वाळूज ता. मोहोळ) हा राहण्यास आला होता. दि. १८ मे रोजी फिर्यादी गोकर्णा घोडके समवेत नरखेड येथे राहत असलेल्या आजारी मुलीला भेटण्यासाठी गेल्या होत्या. त्यादरम्यान गोकर्णा यांचे पती बाळू हे मोलमजुरीच्या कामाला गेले होते. त्यांचा भाऊ अमोल कांबळे हा घरात एकटाच होता. गोकर्णा घोडके यांनी जाताना कपाटामध्ये म्हैस विकून आलेली १ लाख रुपयांची रोख रक्कम, व इतर सोन्याचे दागिने ठेऊन कपाटाला कुलुप लावून चाव्या नेहमच्या ठिकाणी ठेवल्या.

दरम्यान सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास बाळू घोडके यांनी पत्नीला फोन करून सांगितले की अमोल कांबळे हा घरात दिसत नाही, त्याचे कपडे व इतर सामान दिसत नाही. तसेच घरातील लोखंडी कपाटाचे कुलूप तुटलेले आहे. त्यावेळी तात्काळ नरखेड हुन गोकर्णा घोडके या औढीं येथे आल्या. कपाटातील रोख रक्कम व सोन्याचे दागिने पाहिले असता ते दिसून आले नसल्याने त्यांनी भाऊ अमोल पोपट कांबळे याच्यावर संशय

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

यांच्यासाठी मला 'असंच' करावं लागतं !

कल्याण
569-06-349

लोकशाहीचे वैभव असलेल्या संसद भवनचे आज उद्घाटन

७५ आणि १०० रुपयांचे नाणे होणार लाँच

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

भारतीय लोकशाहीचे वैभव असलेल्या नव्या संसद भवनाच्या उद्घाटनाचा सोहळा आज राजधानी नवी दिल्लीत पार पडणार आहे. त्याची जय्यत तयारी झाली असून या सोहळ्यामुळे भाजपामध्ये विशेष आनंदाचा माहोल आहे. या ऐतिहासिक दिवसाचे औचित्य साधून देशाच्या चलनात ७५ आणि १०० रुपयांचे नाणे येणार आहे. भारतीयांसाठी हा एक दुग्धशर्कराचा योग असणार आहे. या नाण्यावर भारतीय राजमुद्रा यासह नव्या संसद भवनाचे छायाचित्र असेल.

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली. त्याचे आणि संसदेच्या नव्या इमारतीचे औचित्य साधून केंद्रीय अर्थमंत्रालय ७५ रुपये मूल्य असलेले विशेष नाणे जारी करणार आहे. या नाण्याचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते केले जाणार आहे. या नाण्यावर आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री एन.टी. रामाराव यांचे छायाचित्र असेल. २८ मे रोजी रामाराव यांची १०० वी जयंती आहे. त्यांच्या जन्मशताब्दी निमित्त हे खास नाणे जारी केले जाऊ शकते.

७५ रुपयांच्या नाण्याची विशेषता काय आहे?

अर्थमंत्रालय जारी करणारे हे ७५ रुपयांचे नाणे वर्तुळाकार असून त्याचा व्यास ४४ मिलिमिटर आहे. ५० टक्के चांदी, ४० टक्के तांबे, ४ टक्के निकेल, ५ टक्के झिंक धातूचे मिश्रण करून या नाण्याची निर्मिती करण्यात आलेली आहे. भारत सरकारने दिलेल्या माहितीनुसार या नाण्याच्या एका बाजूला राजमुद्रा आहे. तसेच या राजमुद्रेच्या खाली सत्यमेव जयते असे लिहिलेले आहे. राजमुद्रेच्या डावीकडे देवनागिरी भाषेत 'भारत' तर उजवीकडे इंग्रजीमध्ये 'इंडिया' असे नाव लिहिलेले आहे. नाण्याचे एकूण वजन ३५ ग्रॅम असून या नाण्याच्या दुसऱ्या बाजूला संसद भवनाची प्रतिमा असेल. यासह संसद भवनाच्या प्रतिमेच्या वरच्या बजूस 'संसद संकुल' असे देवनागिरी लिपीमध्ये तर खालच्या बाजूला 'पार्लामेंट कॉम्पेक्स' असे इंग्रजीमध्ये लिहिलेले

'मन की बात'ला १०० वर्षे पूर्ण झाल्यामुळे विशेष नाणे

याच वर्षी केंद्र सरकारने ३० एप्रिल रोजी नरेंद्र मोदी यांच्या आकाशवाणीवरील 'मन की बात' कार्यक्रमाचे १०० भाग पूर्ण झाल्याचे औचित्य साधून विशेष नाणे जारी केले होते. मागील वर्षी भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाली. हेच निमित्त साधून केंद्राने एक, दोन, पाच, दहा तसेच वीस रुपयाची खास नाणी जारी केली होती.

प्रखर हिंदुत्वनिष्ठ

जयंतीनिमित्त

नाशिक जिल्ह्यातील भगूर येथे विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म २८ मे १८८३ साली झाला. त्यांचे वडील दामोदर सावरकर हे होते. त्यांना तीन अपत्ये झाली. सावरकर हे दुसरे अपत्य होते. सावरकरांना बालपणी आईवडिलांचा सहवास फार मिळाला नाही. त्यांची आई त्यांच्या वयाच्या नवव्या तर वडील १६व्या वर्षी प्लेगने वारले. त्यांच्या थोरल्या वहिनी येसूवहिनींनी त्यांचा सांभाळ केला. त्यांचे प्राथमिक शिक्षण नाशिक येथील शिवाजी विद्यालयात झाले. शालेय जीवनात ते अत्यंत बुद्धिमान विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होते. काव्यरचना सुद्धा ते करीत असत. याशिवाय वक्तृत्व कलेत सुद्धा त्याची गती होती. वयाच्या तेराव्या वर्षी त्यांनी स्वदेशीचा फटका व स्वतंत्रतेचे स्तोत्र ही काव्यरचना केली होती. लहानपणीच त्यांनी भगूर येथील भगवती देवीसमोर सक्षम क्रांतीचा सेतू उभारून 'मारिता मारिता मरेतो झुंजेन' अशी प्रतिज्ञा घेतली होती. त्या वेळच्या प्रथेप्रमाणे त्यांचा विवाह १९०१ साली यमुनाबाई यांच्याशी झाला. सावरकर कॉलेज शिक्षणासाठी पुणे येथे राहिले. त्यांनी प्रसिद्ध फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश १९०२ साली घेतला. शामजी कृष्ण वर्मा यांनी ठेवलेली शिष्यवृत्ती मिळवून ते लंडनला १९०६ साली रवाना झाले. लोकमान्य टिळकांनी ही शिष्यवृत्ती देण्याची शिफारस केली होती. लंडनमध्ये त्यांनी राष्ट्रभक्त समूह ही संस्था स्थापना केली. त्यावेळी त्यांचे सहकारी पागे व म्हसकर हे होते. मित्रमेळा ही संघटना ह्या गुप्त संघटनेची शाखा होती. पुढे या शाखांचे अभिनव भारत या शाखेत रूपांतर झाले. पुण्यामध्ये त्यांनी १९०५ साली विदेशी कापडाची होळी केली. लंडनमध्ये असताना इंडिया हाऊसमधून त्यांनी क्रांतिकारक कारवाया चालू ठेवल्या. जोशेफ मॅझिनी यांच्या आत्मचरित्राचे त्यांनी मराठी भाषेत भाषांतर केले. त्यांनी बॉम्ब तसेच पिस्तुले तयार करण्याचे शिक्षण घेतले. अनेक पितुले त्यांनी भारतात पाठविली.

मदनलाल धिंग्रा हा त्यांचा पहिला क्रांतिकारक शिष्य. त्यांनी बंगालच्या फाळणीला जबाबदार असलेल्या कर्झन वायलीचा पिस्तुलाने खून केला. याबद्दल धिंग्रा यांना फाशीची शिक्षा झाली. नाशिक येथे एक १६ वर्षाचा युवक अनंत कान्हेरे यांने पिस्तुलाने कलेक्टर जॅक्सन याचा सिनेमा गृहात खून केला. याबद्दल कान्हेरे यांना फाशीची शिक्षा झाली. त्यांचे साथीदार कृष्णाजी व विनायक देशपांडे हे सुद्धा फाशी गेले. अनेक इंग्रज इतिहासकारांनी १८५७ शाळांचे स्वातंत्र्यसमर हे बंड होते असे प्रतिपादन केले होते. सावरकरांनी त्यांचे म्हणणे खोडून काढत हे बंड नसून तो एक स्वातंत्र्य लढा होता असे प्रतिपादन केले. १९१० साली त्यांना अटक करण्यात आली. त्यावेळी सावरकरांनी फ्रान्सचे मार्से लिस येथे बोटीतून समुदात उडी मारली.

अखेर त्यांना पकडण्यात आले. क्रांतिकारक कारवायांबद्दल त्यांना ५० वर्षाची काळ्या पाण्याची शिक्षा झाली. तुरुंगात असताना त्यांना अनेक अत्याचारांना सामोरे जावे लागले. त्यांनी तुरुंगातच 'कमला' हे काव्य रचले. तुरुंगावरील भिंतीवर हे काव्य लिहून त्यांनी ते पूर्ण केले. या दरम्यान त्यांनी Essntialas of Hindutva हा ग्रंथ लिहिला. ६ जानेवारी १९२४ रोजी त्यांची सुटका होऊन रत्नागिरी येथे त्यांना स्थानबद्ध करण्यात आले. १३ वर्षे त्यांनी रत्नागिरी येथे काढली. तिथे त्यांनी पतित पावन मंदिराची स्थापना केली. अंधश्रद्धा यावर आवाज उठविला. आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन दिले. त्यांनी असे १५ विवाह लावून दिले. १९३७ साली त्यांची मुंबई येथे भरलेल्या साहित्य संमेलनात अध्यक्ष म्हणून निवड झाली. १९३७ साली ते हिंदुमहासभेचे अध्यक्ष झाले. त्यांनी देशभर दौरे काढले व हिंदूसंघटन बळकट करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले.

सुमारे दहा वर्षे ते हिंदू महासभेचे अध्यक्ष होते. लेखक, कवी, विज्ञाननिष्ठ, हिंदुसंघटक अमोघ वक्तृत्वाची देणगी लाभलेला प्रतिभावान वक्ता, भाषाशुद्धी व लिपी शुद्धी या चळवळीचा प्रणेता स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या काळातील राजकारणातील एका धुरीण व लोकनेता अशा अनेक रूपांनी सावरकरांनी अलौकिक व्यक्तिमत्वाची छाप जनमानसावर ठेवली होती. १९६५ सालच्या भारत-पाकिस्तान युद्धात भारताची सेना लाहोर नजीक पोहोचली होती. त्यावेळी त्यांनी आनंद व्यक्त केला होता. १ फेब्रु १९६६ रोजी यांनी अन्न व औषधे यांचा त्याग केला व प्रायोपवेशन सुरू केले. अखेर २६ फेब्रुवारी १९६६ रोजी ते अनंतात विलीन झाले. प्रसिद्ध संगीतकार सुधीर फडके यांनी सावरकरांच्या जीवनावर चित्रपट काढला होता. सागरा प्राण तळमळला, जयोस्तुते तू महन्मंगले तसेच मर्मबंधांतली ठेव ही अशी त्यांची काव्ये जनमानसात अमर आहेत. त्यांनी एकूण ३८ मराठी व इंग्रजी पुस्तके लिहिली. त्यामध्ये आत्मचरित्र, नाटक, इतिहास वैचारिक लिखाण इत्यादींचा समावेश आहे. अलिकडेच महाराष्ट्र सरकारने त्यांचे जन्मगाव भगूर तसेच रत्नागिरी सांगली व मुंबई येथील स्मारकांचे सुंदर करण्याचे काम हाती घेतले आहे. सावरकरांचे चरित्रकार धनंजय कीर यांनी 'स्वातंत्र्यवीर सावरकर या पुस्तकात म्हटले आहे. टिळकांच्या नंतर भारताचे इतिहासात ज्याने कीर्तीची हाव ठेवली नाही, लक्ष्मीची आराधना केली नाही आणि वैयक्तिक मोठेपणाची हाव बाळगली नाही, ज्याने राष्ट्रीय हिताचीच सदैव चिंता वाहिली, राष्ट्रीय एकतेसाठी सर्व जीवन वेचले, मायभूमीचे विच्छेदन टाळण्यासाठी अखंड झगडा केला आणि राष्ट्रीय प्रतिष्ठेसाठी कार्य केले, असा जर कोणता नेता असेल तो म्हणजे वीर सावरकर हे होय.'

- शांताराम वाघ, पुणे.

सावरकरांचे चरित्रकार धनंजय कीर यांनी 'स्वातंत्र्यवीर सावरकर या पुस्तकात म्हटले आहे. टिळकांच्या नंतर भारताचे इतिहासात ज्याने कीर्तीची हाव ठेवली नाही, लक्ष्मीची आराधना केली नाही आणि वैयक्तिक मोठेपणाची हाव बाळगली नाही, ज्याने राष्ट्रीय हिताचीच सदैव चिंता वाहिली, राष्ट्रीय एकतेसाठी सर्व जीवन वेचले, मायभूमीचे विच्छेदन टाळण्यासाठी अखंड झगडा केला आणि राष्ट्रीय प्रतिष्ठेसाठी कार्य केले, असा जर कोणता नेता असेल तो म्हणजे वीर सावरकर हे होय.'

जिल्हा प्राथमिक शिक्षक पतसंस्थेतर्फे कायमठेव वर्गणीवरील व्याज वाटप

सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या ७२४२ सभासदांना सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाचे कायमठेव वर्गणीवरील व्याज रक्कम रु. १० कोटी ६२ लाख त्यांच्या पगारी बँक खात्यावर जमा करण्याचा निर्णय संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला असल्याची माहिती संस्थेचे चेअरमन मच्छिंद्रनाथ मोरे यांनी दिली.

संस्थेकडे ३१ मार्च २०२३ अखेर ७२४२ सभासद असून त्यांची १२७ कोटी ७५ लाख इतकी कायमठेव वर्गणी संस्थेकडे जमा आहे. त्यावर संस्था ९ टक्के व्याजदराने दरवर्षी व्याज देत असते. त्यास अनुसरुन सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाचे व्याज मे महिन्यात मिळणाऱ्या सभासदांच्या वेतनातील वसुली, संस्थेस प्राप्त झाल्यावर वाटप करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील शिक्षक सभासदाचे तालुकावर खालीलप्रमाणे व्याज आहे.

अक्कलकोट (८५१) १ कोटी ३७ लाख ५ हजार, उत्तर सोलापूर (३६३) ५४ लाख ८७ हजार, दक्षिण सोलापूर (६४७), १ कोटी १ लाख ३२ हजार, मोहोळ (६६८) ८५ लाख ४० हजार, पंढरपूर शहर (३७९) ४२ लाख १५ हजार, पंढरपूर ग्रामीण (३५२) ४३ लाख ७१ हजार, मंगळवेढा (५०५) ८६ लाख ४ हजार, सांगोला (६७४), १ कोटी ८ लाख ६० हजार, माळशिरस (८८९) १ कोटी ३१ लाख ६० हजार, कुर्डूवाडी (७७३) १ कोटी १९ लाख ५४ हजार, करमाळा (५७७) ६९ लाख ४९ हजार, बार्शी (२६६) ४१ लाख ९९ हजार, वैराग (२७८) ४० लाख ७० हजार असे आहे.

माहे मे २०२३ मध्ये सभासदांच्या वेतनातील वसुली संस्थेस मिळण्यास उशीर झाल्यास सदरचे व्याज वाटप जमा होण्यास मागेपुढे होईल, त्याबाबत सभासदांनी सहकार्य करावे, असे आवाहन व्हा. चेअरमन शेखर कोरके यांनी केले आहे. यावेळी संस्थेचे संचालक विरभद्र यादवाड, शिवाजी पाटील, रमेश यंटेनवरु, तानाजी गुंड, रामचंद्र यादव, संजय चेळेकर, गुलाबराव पाटील, विठ्ठल काळे, रमेश शिंदे, हनुमंत सरडे, आबासाहेब जाधवर, राजेंद्र आवारे, सत्यवान जैनजांगडे, संभाजी फुले, रवींद्र पाटील, संचालिका राणी व्हनमाने, शितल चव्हाण, तज्ञ संचालक झुल्फीकार मुजावर, भगवान चौगुले उपस्थित होते.

सोलापूर सिंहगडची 'तेजा शेवाळे ' विद्यापीठात प्रथम

सुराज्य/सोलापूर

नुकत्याच जाहीर झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या प्रथम वर्ष प्रथम सत्र अभियांत्रिकीच्या निकालामध्ये सोलापूर सिंहगडची 'तेजा वसंत शेवाळे ' हिने ९६% टक्के गुण मिळवून सोलापूर विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवला.

तेजा वसंत शेवाळे हिने इंजिनीअरिंग मायथेमॅटिक्स व इंजिनीअरिंग केमिस्ट्री या दोन विषयामध्ये ७० पैकी ७० गुण मिळवले. तसेच विशाल कुंडलिक मोटे हा विद्यापीठात तृतीय व अंबादास शंकर गोटे हा विद्यापीठात चतुर्थ क्रमांक पटकवाला. विद्यापीठाच्या गुणांनुक्रमे पहिल्या ५ मध्ये सोलापूर सिंहगडच्या ३ विद्यार्थ्यांनी स्थान मिळवले आहे. तसेच या यशाबद्दल सिंहगड संस्थेचे सहसचिव संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले,उपप्राचार्य डॉ. रवींद्र व्यवहारे व डॉ. शेखर जगदे तसेच प्रथम वर्ष विभाग प्रमुख डॉ. विनोद खरात सर, यांच्या हस्ते सत्कार करून यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. पालक व विद्यार्थ्यांच्या विश्वासास पात्र राहून महाविद्यालयाने यशाची परंपरा कायम ठेवली आहे, त्याबद्दल महाविद्यालयाचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

मराठा सेवा संघाच्या शहराध्यक्षपदी पाटील

सुराज्य/सोलापूर

मराठा सेवा संघाच्या शहराध्यक्षपदी सेवानिवृत्त पोलीस उपाधीक्षक सूर्यकांत पाटील यांची एकमताने निवड करण्यात आली. पोलीस सेवेत असताना त्यांचा सर्व जाती धार्मातील लोकांशी चांगला जनसंपर्क असल्याने सर्व समाजात त्यांचा आदरयुक्त दरारा आहे. असा लोकप्रिय चेहरा मराठा सेवा संघाला मिळाला असल्याने भविष्यात मराठा सेवा संघाची वाटचाल जलद गतीने होईल, अशी अपेक्षा सर्व समाजबांधवाकडून होत आहे.

मराठा सेवा संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीच्या सुचनेनुसार मराठा सेवा संघाच्या कार्यालयात मराठा सेवा संघाच्या महत्त्वपूर्ण पदाधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या. शहराध्यक्षपदासाठी तीन नावे आली होती मात्र वरिष्ठ पातळीवरून सूर्यकांत पाटील यांचे नाव फिक्स केल्याने शुक्रवारी सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत पाटील यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली. यासाठी निरीक्षक म्हणून केलेले मराठा सेवा संघाचे जिल्हा समन्वयक दत्तामामा मुळे आणि जिल्हा उपाध्यक्ष जी.के.देशमुख यांच्या हस्ते नियुक्तीचे पत्र देण्यात आले.

सूर्यकांत पाटील यांनी ३३ वर्षे पोलीस दलात काम केले आहे. माळवते शहराध्यक्ष सदाशिव पवार यांच्याकडे जिल्हा उपाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. शहर कार्याध्यक्षपदी सुजय वायचवरे यांची तर उपाध्यक्ष म्हणून प्रवीण थोरात यांची निवड करण्यात आली आहे. या कार्यक्रमाला मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव प्रा. लक्ष्मण महाडिक, कोषाध्यक्ष आर. पी. पाटील, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सोमनाथ राऊत, शहराध्यक्ष प्रकाश ननवरे, तानुबाई पत्रकार कक्षाचे जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, वधू वर कक्षाचे जिल्हाध्यक्ष अंबादास सपकाळे, शहराध्यक्ष राम माने, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हा कार्याध्यक्षा अभिजली जाधव, सांस्कृतिक कक्षाचे मूर्तिकार नितीन जाधव, गोवर्धन गुंड, रमेश जाधव आणि असंख्य पदाधिकारी उपस्थित होते.

मासिक पाळी दिनानिमित्त जनजागृती सप्ताह

सोलापूर : जागतिक पातळीवर २८ मे हा दिवस 'मासिक पाळी दिवस' म्हणून साजरा केला जातो. यावर्षीच्या जागतिक मासिक पाळी दिनानिमित्त 'आम्ही कटिबद्ध आहोत' ही या सप्ताहाची थिम असणार आहे. या दिनाचे औचित्य साधून २८ मे रोज जिल्ह्यात मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापन जनजागृती सप्ताह राबविण्यात येत असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी दिली. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी म्हणाले, 'मासिक पाळी ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. पण याबबत असलेल्या अज्ञानापोटी निर्माण झालेल्या विविध रूढी परंपरांमुळे मुली-महिलांना मोठ्या प्रमाणात मानसिक व शारीरिक त्रासाला सामोरे जावे लागते. स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा - २ हा मासिक पाळी व्यवस्थापनाचा महत्त्वाचा घटक आहे. या पार्श्वभूमीवर या दिनाचे औचित्य साधून जिल्ह्यात रॅली, चर्चासत्रे, प्रशिक्षणे, प्रात्यक्षिक, प्रबोधन आदी उपक्रमांद्वारे जनजागृती सप्ताह जिल्हा, तालुका व ग्रामपंचायतस्तरावर राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती, ग्रामपंचायत, आरोग्यवर्धीनी केंद्र ,आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस, महिला बचत गट यांनी पुढाकार घेऊन मोठ्या प्रमाणात या सप्ताह निमित्त 'मासिक पाळी व्यवस्थापन व आरोग्याची काळजी' या विषयावर माहिती देऊन जनजागृती करावी असे आवाहन जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे यांनी केले आहे.

श्री जांबमुनी मोची मंडळातर्फे सामूहिक विवाह

सुराज्य/सोलापूर

श्री जांबमुनी मोची समाज सेवा मंडळ, लष्कर, सोलापूर यांच्यावतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही २९वे वर्षी १३ जोडप्यांचा विवाह सोहळा पार पडला. बापूजी नगर येथील पटांगणामध्ये विवाह सोहळा संपन्न झाला.

सर्व वधूवरास संसारोपयोगी साहित्य व जांबमुनी प्रतिमा रतिकांत कमलापुरे यांच्यातर्फे देण्यात आले. नववधुवरांना कपाट श्रीनिवास कुर्मय्या म्हेत्रे यांच्यातर्फे देण्यात आले. घरगुती साहित्य, चादर, बेडशीट, संजय म्हेत्रे यांच्यावतीने देण्यात आले. स्टील डबा व शरबत सिद्राम बाजरे यांच्यावतीने देण्यात आले. मिक्सर बाबू भंडारे यांच्यावतीने देण्यात आले, सायण्णा कुमार यांच्यावतीने दोन तांब्याचे ग्लास देण्यात आले. नितीन मुकारे यांच्यावतीने भिंतीवरील घड्याळ देण्यात आले. पाण्याचे जार कै. मरगप्पा तल्लारे व कै. हणमंतु जंगम यांच्या स्मरणार्थ पाणपोई करण्यात आले.

समाजातील वीटभट्टी मालक श्रीनिवास बाबू जंगम, व्यंकटेश हणमापागोळू, दत्तू आसादे, परशुराम वायमारे, बाबू विटे, शिवलिंग म्हेत्रे, अशोक करमोळू, सिद्धप्पा वाकीटोळू, सिद्धलिंग म्हेत्रे, सुरेश करेमोळू, नागनाथ देशमुख व त्यांच्या सहकाऱ्यांकडून विवाह सोहळ्यातील उपस्थितांना जेवणाची व्यवस्था करण्यात आली. तद्नंतर सर्व नववधू-वरांचे वरात बापूजी नगर पटांगणातून लष्कर, सरस्वती चौक येथील मारुती मंदिरापर्यंत सवाद्य मिरवणूक काढण्यात आली.

सोहळ्यास माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, नईम खान तसेच आमदार प्रणिती शिंदे, भाई जगताप, सुभाष देशमुख, माजी आमदार नरसय्या आडम, विश्वनाथ चाकोते, महेश कोठे, नारायणपेठकर बंधू, शिवाजी सावंत, माजी खासदार धर्मण्णा साधूल, माजी महापौर संजय हेमगड्डी, अमोल बापू शिंदे, भारत जाधव, नागेश गायकवाड, डॉ. एस. एस. मणियार आदी मान्यवर उपस्थित होते.

बारावीच्या परीक्षेत शहरातील विविध महाविद्यालयांचे यश

सुराज्य/सोलापूर

राजेभाई उर्दू हायस्कूल व ज्यु. कॉलेज

राजेभाई उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट अँड सायन्स सोलापूरचा फेब्रुवारी २०२३मध्ये घेण्यात आलेल्या एचएससी परीक्षेमधील कला विभागाचा निकाल शंभर टक्के लागला आहे तसेच विज्ञान विभागाचा निकाल ९७.९५ टक्के लागला आहे. **विज्ञान विभाग** - मुस्तकीन राजू बांगी, ७१.१७ टक्के, आयेशा जावेदअंहमद गोडीकर ७०.१७ टक्के, तहुरा ताजुद्दीन पटेल ६८.१७ टक्के, **कला विभाग** - १) आसिया जावेद शेख ७६.५० टक्के, ईशरत इब्राहिम सय्यद ७१.६७ टक्के, हिना सलीम रंगरेज ६५.५० टक्के. वरील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे व विषय शिक्षकांचे संस्थेचे सचिव फैजअहमद इनामदार, उपाध्यक्षा तस्निमआरा शेख, प्राचार्य सबिहा फिरजादे आदींनी अभिनंदन केले.

दयानंद शास्त्र व कला महाविद्यालय

फेब्रुवारी २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या बोर्ड परीक्षेत दयानंद शास्त्र व कला महाविद्यालयाचा निकाल ९०.९२ टक्के तर दयानंद कला महाविद्यालयाचा निकाल ६०.७४% निकाल नुकताच जाहीर झाला आहे. कला विभागात साक्षी जिनेंद्र सुराणा हे विद्यार्थिनी ८५.८३% गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम आली.

माधुरी संतोष शिरसाट ही विद्यार्थिनी ८३.३३ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात द्वितीय आले तर ऋषिकेश लक्ष्मण घोडके हा विद्यार्थी ८३ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात तृतीय आला. तसेच वैष्णवी सोमेश्वर कोडगे, शिवशंकर भिवा कवडे या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. शास्त्र शाखेत प्रज्ञा लक्ष्मीनारायण कोटा ही विद्यार्थिनी ८१.६७ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात सर्वप्रथम आली आहे. प्रशांत नागप्पा उमराणी हा विद्यार्थी ७८.८३ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात द्वितीय तर मोहित मोहन ओहळ हा विद्यार्थी ७५.६७ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात तृतीय आला. याशिवाय विनायक रवींद्र नागेल्ली, उत्कर्ष रामदास खवेकर या विद्यार्थ्यांनी देखील नेत्रदीपक यश मिळवले आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे स्थानिक सचिव महेश चोप्रा, प्रशासक प्रो. डॉ. विजयकुमार उबाळे, महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. बी. एच. दामजी, उपप्राचार्य अरुण खांडेकर, पर्यवेक्षक प्रा. विजयकुमार बिराजदार, कला शाखेचे समन्वयक प्रा. माधव कुलकर्णी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

कुमठे कनिष्ठ महाविद्यालय

कुमठे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय कुमठे, सहकार तपस्वी ब्रह्मदेव दादा माने यांनी स्थापन केलेल्या कुमठे शिक्षण संकुलातील कला वाणिज्य महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील शंभर टक्के निकालाची परंपरा कायम ठेवत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले तसेच कला विभागाचा निकाल ८३.६४ टक्के लागला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार दिलीपराव माने, मुख्य विश्वस्त माजी नगरसेवक जयकुमार माने, विश्वस्त स्वाती माने, महाविद्यालयाचे प्राचार्य जयसिंग गायकवाड, उपप्राचार्य प्रकाश काशीद, पर्यवेक्षक मलकारी कोरे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक प्राध्यापकांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. **वाणिज्य विभाग** - १) आरती गणेश चौगुले ८२.५० टक्के २) अक्षता मल्लिकार्जुन सुतार ८१.३३ टक्के ३) राधिका गुरुनाथ निकम ७७.३३ टक्के. **कला विभाग** -१) कसक हमीद जमादार ८४.६७ टक्के २)रोहित कुमार राजेंद्र कुमार चव्हाण ७१.३३ टक्के ३) प्रगती महादेव चव्हाण ६९.५० टक्के.

रा. स. चंडक हायस्कूल व एसईएस ज्यु. कॉलेज

सम्राट चौक येथील रा. स. चंडक हायस्कूल व एसईएस ज्युनिअर कॉलेज कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी फेब्रुवारी २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या एचएससी परीक्षेत उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेचा निकाल ९८.९२ टक्के लागला असून २७९ विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ट झाले. त्यातील २७६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. २७६ विद्यार्थ्यांपैकी ४२ विद्यार्थ्यांना डिस्टिंन्शन तर १३७ विद्यार्थ्यांना फर्स्ट क्लास व ८५ विद्यार्थ्यांना सेकंड क्लास तसेच १२ विद्यार्थ्यांना पास क्लास मिळाला आहे. विज्ञान शाखेत गौरी संतोष काळे ही विद्यार्थिनी ८९.८३% येऊन गुण मिळवून प्रथम क्रमांक आली आहे. मिथील अमोल जतकर यांनी ८९ टक्के येऊन द्वितीय तर आयुष विजय अवताडे यांनी ८७.३३% गुण मिळवून तृतीय क्रमांक संपादन केला आहे.

एस व्ही सी एस चा ९९.३९ टक्के निकाल

एस व्ही सी एस जूनिअर कॉलेज एम आय डी सी चा बारावीचा विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला. अंकित चिपा याने ७५.१७ टक्के गुण मिळवून कॉलेजात प्रथम क्रमांक पटकाविला. तर कल्पना गवनी हिने ७२ टक्के गुण मिळवून द्वितीय व सानिया बागवान हिने ७१.३३ टक्के मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केली. वाणिज्य शाखेचा निकाल १०० टक्के लागला असून नम्रता पुरुड हिने ८४.५०% गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक मिळविली तर साबिया नदाफ हिने ७९.६७ टक्के गुण मिळवून कॉलेजात द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली.

ऋतुजा सकट हिने ७९.१७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविली. कला शाखेचा निकाल ९७.४० टक्के लागला. धनश्री कंठीकर हिने ७७.१७ टक्के गुण मिळवून कॉलेजात प्रथम क्रमांक मिळविला . तर दत्ता शेंडगे यांने ७३.१७ टक्के गुण मिळवून द्वितीय तर कशिश शेख याने ७१.०० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.एमसीव्हीसी शाखेचा निकाल ७८.२६ टक्के लागला असून मृणाल खमितकर याने ७४.१७ टक्के गुण मिळवून प्रथम, नागेश साखरे याने ६४.५० टक्के गुण मिळवून द्वितीय तर आकाश बिराजदार यांने ६४.३३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक प्राध्यापकांचे प्राचार्य संगप्पा म्हमाणे, उपप्राचार्य गिरमल बुगडे पर्यवेक्षक विलास म्हमाणे आदींनी अभिनंदन केले.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

पाटील यांनी दिली नागनाथ देवस्थानास सपत्नीक भेट

सोलापूर : महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रीय युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष श्री शरण बसवराज पाटील यांनी गुरुवार दिनांक २५ मे रोजी श्रीक्षेत्र वडवळ येथील सद्गुरु नागनाथ महाराजांचे सपत्नीक दर्शन घेतले. यावेळी नागनाथ देवस्थान पंच कमिटीच्या वतीने सद्गुरु नागनाथ महाराजांची प्रतिमा देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मोहोळ तालुका राष्ट्रीय काँग्रेसचे तालुकाध्यक्ष तथा भीमा सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक सुरेश आप्पा शिवपुजे, श्री नागनाथ देवस्थान पंच कमिटीचे सचिव श्री शाहू शिवपुजे, मोहोळ तालुका लिंगायत महासंघाचे तालुका उपाध्यक्ष शिवकुमार शिवपुजे , नागनाथ मंदिराचे पुजारी नानासाहेब शिवपुजे व इतर मान्यवर उपस्थित होते. नागनाथ देवस्थान पंच कमिटीच्या वतीने नागेश भक्तांसाठी केलेल्या सुविधा पाहून पाटील यांनी समाधान व्यक्त केले.

गुंड यांना अहिल्यादेवी होळकर पुरस्कार

चिखली : महिला बालविकास क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या मोहोळ तालुक्यातील हिवरे गावच्या समाजसेविका कांताबाई मच्छिंद्र गुंड यांना जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले .

कांताबाई गुंड यांनी जवळपास २०२१ पासून ते आजतागायत सोलापूर जिल्ह्यातील कमीतकमी दीड ते दोन हजार मुलींच्या आणि महिलांच्या संसाराची घडी विस्कटलेले असताना त्यांचे समुपदेशन करून त्यांचे संसार पुर्व पदावर आणण्यासाठी अतोनात प्रयत्न करून मोडलेले संसार नव्याने उभा करण्याचे काम केले आहे. अशी एक नव्हे अनेक कौतुकास्पद कार्य गुंड यांनी महिला आणि बाल विकास क्षेत्राच्या माध्यमातून केलेले आहे .त्यांच्या अशा या उत्कृष्ट व कौतुकास्पद कार्याबद्दल महिला व बाल विकास विभागामार्फत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार स्मृतिचिन्ह व शाल श्रीफळ आणि दहा हजार रूपयांचा चेक जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या हस्ते पोलिस अधीक्षक कार्यालयात देऊन गौरविण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, महिला व बालविकास अधिकारी खोमणे, इरकल , तसेच पोलिस अधीक्षक शिरिष सरदेशपांडे, अप्पर जिल्हाधिकारी शमा पवार. महिला बाल विकास क्षेत्रात काम करणाऱ्या महिला आणि गावागावांतील पदाधिकारी मोठ्या बहुसंख्येने उपस्थित होते .

प्रज्ञाशोध परीक्षेत सिध्देश्वर शाळेचे यश

सोलापूर : प्रज्ञाशोध परीक्षेत श्री.सिध्देश्वर प्राथमिक शाळा साखर कारखाना कुमठे येथील अकरा विद्यार्थी राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत येऊन यवयवीत यश संपादन केले.

मार्च २०२३ रोजी घेण्यात आलेल्या ए.टी.एस.प्रज्ञाशोध परीक्षेत इयत्ता पहिलीतील ओम कांबळे, श्रावणी पाटील अंकित बगले, स्वरा पाटील, प्रज्वल बिराजदार, शिवम सगर, वैष्णवी कोळी आयुष कांबळे, प्रतिक्षा साळुंके, विवेक जडगे, आदर्श आहिरवाडी असे अकरा विद्यार्थी राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत आपले नाव कोरुन यवयवीत यश संपादन केले. या परीक्षेसाठी मुख्याद्यापक सिध्देश्वर म्हेत्रे, अर्चना पवार, यांचे मार्गदर्शन लाभले तर संस्थेचे अध्यक्ष धर्मराज काडादी, उपाध्यक्ष सिध्दाराम चाकोते, समन्वयक संतोष पाटील, यांनी अभिनंदन केले.

फिरते पुस्तक वाहन सोलापुरात

सोलापूर : उर्दू भाषा विकास परिषद नवी दिल्ली यांच्यावतीने दरवर्षी प्रत्येक जिल्ह्यात फिरते पुस्तक वाहन प्रदर्शन आयोजन करण्यात येते. आज शुक्रवार दि. २६ रोजी या पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन प्रसिध्द उर्दूचे ज्येष्ठ कवी बशीर परवाज यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषद एज्युकेशन (माध्यमिक) ऑफिसर जावीद शेख, या पुस्तक वाहनाचे समन्वयक अतहर परवेज दफेदार, स्कूल बोर्डाचे सुपरवायझर निलोफर शेख, माजी प्राचार्य अ. जब्बार शेख, कवी सिराज सोलापुरी, मुख्याध्यापक आसिफ इक्बाल, अ. मन्नान शेख, मीर अफजल आदी उपस्थित होते. बशीर परवाज यांनी पुढे म्हणाले की, फिरते पुस्तक प्रदर्शनामध्ये उर्दू साहित्यातील सर्व साहित्यिकांची, कवी व लेखकांची कांदबरी, कविता, गझल पुस्तके असतात. याचा लाभ सर्व उर्दू रसिकांनी घ्यावा.

जावीद शेख यांनी आपल्या भाषणात म्हणाले की, हे पुस्तक वाहनामध्ये जे पुस्तके असतात ते क्वचीत आपल्याला भेटतात, तरी आपण जास्तीत खरेदी करावे, असे आवाहन केले.यावेळी इक्बाल प्रंडे, मौला मुदेल, इरफान पटेल, मौलाना खरादी, मुश्ताक गदवाल,आकिद शेख, समीर निचलकर आदी उपस्थित होते.सुत्रसंचलन मुईज शेख यांनी केले.

मोबाईल केल्याच्या संशयावरून मारहाण

सोलापूर : मोबाईल केल्याच्या संशयावरून लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत तिघेजण जखमी झाले . ही घटना मुळेगाव रोडवरील सरवदे नगरात शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली .

आसमा मोहसीन पठाण (वय ३०), सानू पठाण (वय १४) आणि फैजान पठाण (वय २२ सर्व रा.हणार सरवदे नगर) अशी जखमीचे नावे आहेत . त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

रात्री बारा वाजेच्या सुमारास त्यांना पिरसाब शेख, आयान शेख आणि इतर तीन जणांनी मारहाण केली. अशी नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

रुक्मिणी यादव यांचे निधन

श्रीपूर : महाळुंग मायनर येथील रुक्मिणी विश्वनाथ यादव यांचे वयाच्या ८० व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पाच मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे त्या श्रीपुर कामगार सोसायटीचे संचालक संजय यादव यांच्या मातोश्री होत.

सामाजिक स्वास्थ्यासाठी चित्रपटाची गरज: डॉ. काळे

अक्षर मानव आणि सोलापूर विद्यापीठातर्फे चित्रपट वितरण कार्यशाळेचा शुभारंभ

सुराज्य/सोलापूर

समाजात गुन्हेगारी वाढत आहे. पोलिस म्हणून आम्ही यावर प्रतिबंध करण्यासाठी प्रयत्न करत असतोच. मात्र चित्रपट हे सामाजिक प्रबोधन करतात. त्यामुळे सामाजिक स्वास्थ्य उत्तम राहण्यासाठी चित्रपट माध्यमाची नितांत आवश्यकता आहे. अक्षर मानव आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने ही चित्रपट वितरण कार्यशाळा आयोजित करून या प्रक्रियेला गती दिली आहे, असे प्रतिपादन पोलिस उपायुक्त डॉ. दिपाली काळे यांनी केले.

अक्षर मानव चित्रपट विभाग आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय चित्रपट वितरण कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. दिपाली काळे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिध्द साहित्यिक राजन खान होते. विद्यापीठाचे प्र - कुलगुरू प्रा. डॉ. गौतम कांबळे यांची विशेष उपस्थिती होती. अक्षर मानव चित्रपट विभागाचे अध्यक्ष प्रवीण जावळे, अक्षर मानव वितरण विभागाचे अध्यक्ष डॉ. प्रमोद काळे, मास कम्युनिकेशन विभागाचे प्रमुख डॉ. रवींद्र चिंचोलकर यांचीही उपस्थिती होती. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापिठाच्या सामाजिक शास्त्रे संकुल सभागृहात ही दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. अक्षर मानव संस्थेचे अध्यक्ष राजन खान अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, बुध्द, चार्वाकांचे विचार पुढे नेण्याचे काम अक्षर मानव ही संस्था करत आहे. हल्ली हृदयापासून संवाद होत नाही. मानवातील संवाद वाढायला हवा. माणूस म्हणून एकत्र येऊ. काहीतरी नवे करू. राज्यशासन जसे चालते तसे समाजाचे काम समाजाकडून चालावे. अख्या जगाचे दर्शन घडविण्याची आणि बिघडवण्याची ताकद चित्रपटात असते. समाजाला पुढे येऊन जाणारे, समाज घडविणारे चित्रपट पुढे यावेत यासाठी आम्ही काम करत आहोत. चित्रपट क्षेत्रात लॉबिंग चालते. त्यांच्या नादाला आम्ही लागणार नाही.आम्ही आमची नवी व्यवस्था निर्माण करू. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र- कुलगुरू प्रा. डॉ. गौतम कांबळे म्हणाले की, अक्षर मानव या संस्थेने विद्यापीठाच्या सहकार्याने घेतलेली कार्यशाळा महत्त्वाची आहे. अनेकांच्या डोक्यात विविध संकल्पना असतात मात्र त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी अशा कार्यशाळेची उपयुक्तता आहे. या कार्यशाळेचा विद्यार्थ्यांना चांगला फायदा होईल. विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागाच्या टिव्ही आणि रेडीओ स्टुडिओमुळे शॉर्टफिल्म आणि डॉक्युमेंट्री बनविण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे. या आव्हानात्मक क्षेत्रात टिकून राहण्यासाठी आणि यशस्वी होण्यासाठी अशा कार्यशाळांचे नितांत आवश्यकता आहे.

दुपारच्या सत्रात अजय फुटाणे (चित्रपट वितरक), ड. किरण रोंगे पाटील, राजन खान, सागर वंजारी यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. औदुंबर मस्के यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. तेजस्विनी कांबळे, श्री. नागेश खराडे यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. अंबादास भासके यांनी मानले. ही कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी प्रवीण सोनवणे, रवी गजधाने, अमोल वायमारे, पवन भालेदार, डॉ. बाळासाहेब मागाडे, ऋषीकेश मंडलिक आदी परिश्रम घेत आहेत.

उध्दव ठाकरे यांचे कार्य सर्वत्र पोहचवा

जिल्हाप्रमुख अमर पाटील यांचे आवाहन

सुराज्य/सोलापूर

राज्याचे मुख्यमंत्री असताना उध्दव ठाकरे यांनी उल्लेखनीय काम केले आहे. कोरोना महामारीचा काळ त्यांनी व्यवस्थित हाताळला आहे.अनेक कल्याणकारी योजना राबवून त्यांनी राज्याला प्रगतीच्या दिशेने नेले आहे.विकासाच्या बाबतीत केलेले उध्दव ठाकरे यांचे कार्य शिवसैनिकांनी त्यांचे कार्य तळागाळापर्यंत पोहचवावेत असे आवाहन शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख अमर पाटील यांनी केले.

सोलापूर येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित केलेल्या आढावा बैठकीत पाटील बोलत होते.यावेळी संपर्कप्रमुख अनिल कोकीळ, यांच्या मार्गदर्शनाखाली सह संपर्कप्रमुख उत्तमप्रकाश खंदारे,महिला जिल्हाप्रमुख प्रिया बसवंती बैठक झाली यावेळी ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीने चांगले काम केले आहे, मात्र भाजपने पैशाच्या जोरावर शिवसेनेचे आमदार फोडून सत्ता मिळवली आहे.

ईडीची भीती दाखवून राज्यातील नेत्यांमध्ये दहशत माजवित आहेत. एकनाथ शिंदे यांनी दगाफटका करून सत्ता मिळवली आहे.सर्वोच्च न्यायालयाने तत्कालीन राज्यपाल यांच्या अन्यायकारक कृतीला आणि शिंदे, देवेंद्र फडणवीस यांच्या सत्ता स्थापन प्रक्रियेला चांगलेच फटकारले आहे.केंद्र सरकार ताकदीवर शिंदे व फडणवीस यांनी सत्ता मिळवली आहे. राज्यात उध्दव ठाकरे यांच्यावय सहानभूती वाढत आहे.येणाऱ्या सर्व निवडणुकीत ठाकरे गटाचा निश्चितच विजय होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने ठाकरे गटाच्या बाजूने मांडलेले मुद्दे सकारात्मक असून त्यांचे १६ आमदार अपात्र होणार आहेत.येणा-या काही दिवसांत त्यांचे सरकार कोसळणार आहे.ही माहिती शिवसैनिकांनी गावोगावी चावडी व पारावर जाऊन जनतेपर्यंत पोहचविणे गरजेचे आहे.शिवसैनिकांनी उध्दव ठाकरे यांनी मुख्यमंत्री असताना केलेल्या सर्व समावेशक विकासकामे जनतेपर्यंत पोहचविणे गरजेचे आहे.संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांनी कामाला लागावेत असे आवाहन पाटील यांनी केले.

या बैठकीस सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील शहर प्रमुख विष्णू कारमपुरी ,उपजिल्हाप्रमुख संतोष केंगनाळकर, उपजिल्हाप्रमुख संतोष पाटील,विक्रांत काकडे, राजू बिराजदार,संजय पोळ,योगीराज पाटील, धर्मराज बगले,आकाश गंगदे,गंगाराम चौगुले, वजीर शेख,मोसिन शेख,बालाजी चौगुले, पूजा खंदारे,खंडू सलगर ,लिंगराज हुळे,राहुल गंदुरे,लहू गायकवाड,तुषार अवतडे,ननवरे सरपंच,शिक्षक सेना मसरे सर,रविकांत कांबळे,सचिन गंदुरे,अजित स्वामी, आनंद देशमुख,सचिन माने, रेवण बुक्कानुरे,आदीपदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते

केस मागे घेण्याच्या कारणावरून महिलेस मारहाण

सोलापूर : तू माझ्याविरुद्ध दिलेली केस मायारी घे,तुला लय मस्ती आली आहे,तू मला उलट उत्तर देतेस का असे म्हणून शिवीगाळ करत महिलेला हाताने व लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना दि.२६ मे रोजी दुपारी पाच वाजण्याच्या सुमारास गवळी वस्ती येथे घडली.

याप्रकरणी पूजा चेतन गायकवाड (वय-३०,रा.गवळी वस्ती) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून धनराज महादेव जमादार (रा.माळीनगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पवार हे करीत आहेत.

ग्राहक सेवा केंद्रातून बोलत असल्याचे सांगून महिलेला दीड लाखांना फसवले

सुराज्य/सोलापूर

क्रेडिट कार्ड सुरू करण्यासाठी मदत करण्याच्या बहाण्याने बँकेच्या ग्राहक सेवा केंद्रातून बोलत असल्याचे भासवून महिलेच्या खात्यातून दीड लाख रूपये काढून येत महिलेला फसवले.याप्रकरणी प्रभा ज्ञानेश्वर कदम (वय-४५,रा. विजापूर नाका) यांनी विजापूर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून एका मोबाईल धारकावर गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी कदम यांना आपले क्रेडिट कार्ड सुरू करायचे होते. याच दरम्यान त्यांना एका अज्ञात इसमाने फोन करून आपण बँकेतून बोलत असल्याचे सांगून त्यांना एक प डाऊनलोड करण्यास सांगितले. त्यानंतर संबंधिताने त्यांच्या खात्यातील १ लाख ४२ हजार ५९४ रूपये काढून घेतले. ही घटना १ जून २०२२ मध्ये घडली. याप्रकरणी प्रभा कदम यांनी तब्बल अकरा महिन्यांनी विजापूर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. गुन्हा दाखल झाला असून घटनेचा तपास पोलिस निरीक्षक हनपुडे पाटील करत आहेत.

अज्ञात चोरट्याने घरातील रक्कम पळवली

सोलापूर : कोणीतरी अज्ञात चोरट्याने घराच्या उघड्या दरवाजातून प्रवेश करत किचन मधील रॅकमध्ये फिर्यादी संजय चिदानंद हुंडेकरी (वय-३९,रा. सरवदे नगर) यांच्या पत्नीने ठेवलेली ९ हजार २०० रुपयेची रक्कम चोरून नेली आहे.ही घटना २४ ते २५ मे दरम्यान सरवदे नगर येथे घडली.याप्रकरणी संजय हुंडेकरी यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल भांगे हे करीत आहेत.

डी मार्ट परिसरातील अतिक्रमण हटवले

पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या साह्याने महापालिकेची कारवाई

सुराज्य/सोलापूर

शहरातील आसरा चौक, आसरा रेल्वे पूल, डी मार्ट पाण्याच्या टाकी परिसरात महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने कारवाई करण्यात आली. यावेळी खोकी, चार चाक गाड्या, इतर साहित्य जप्त जप्त करण्यात आले. पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या साह्याने ही मोहीम राबविण्यात आली.

सोलापूर महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागामार्फत अतिक्रमण विरोधात कारवाई नियमितपणे करण्यात येत आहे. सोलापूर शहरात रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्यात येत आहे. काही दिवसांपासून शहरातील नवी पेठ, माणिक चौक, मधला मारुती, राणी लक्ष्मीबाई मंडई , विजापूर रोड, रेल्वे स्टेशन रोड यासह विविध ठिकाणी कारवाई करण्यात आली होती. महापालिका प्रशासनाकडून नियमितपणे ही कारवाई सुरूच ठेवण्यात आली आहे.

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने दुसऱ्या सत्रात उशिरापर्यंत सोलापूर शहरातील गजबजलेल्या आसरा चौक, आसरा रेल्वे पूल, डी मार्ट जवळ, पाण्याच्या टाकी परिसरातील रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्यात आले. पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या साह्याने ही मोहीम बेधडकपणे राबविण्यात आली. शहरातील आसरा चौक, डी मार्ट पाण्याच्या टाकी परिसरात रस्त्यावर रहदारीला अडथळा ठरणारे अतिक्रमण हटविण्यात आले. यावेळी ३ खोके, चार चाकी २ गाड्या, प्लास्टिक साहित्य, इतर साहित्य जप्त करण्यात आले. यापुढे शहरात विविध ठिकाणी अतिक्रमण विरोधी मोहीम नियमितपणे राबविण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभाग प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांनी दिली.

जवळे गावच्या पाणीपुरवठा योजनेसाठी ४ कोटी मंजूर

सुराज्य/सांगोला

जलजीवन मिशन योजनेतंर्गत जवळा ता सांगोला येथील जवळा नळ पाणी पुरवठा योजनेस मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,पुणे प्रादेशिक विभाग पुणे, यांचेकडून सुमारे ४.९२ कोटी च्या कामास तत्वता मंजूरी मिळालेली आहे. काल शुक्रवारी सकाळी मुख्य अभियंता यांनी सादरीकरणाचे अवलोकन करून या योजनेस तात्काळ मंजूरी दिली आहे.

जलजीवन मिशन योजनेअंतर्गत जवळा नळ पाणीपुरवठा योजना मंजूरीकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग सांगोला उपअभियंता सुरेश कमळे, प्रभारी कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड यांनी विशेष परिश्रम घेतले. आमदार शहाजीबापू पाटील व माजी आमदार दीपक साळुंखेपाटील यांनी दिलीप स्वामी, सुरेश कमळे व सुनील कटकधोंड यांचे विशेष कौतुक केले आहे. या जलजीवन मिशन योजनेचा जवळे गाव, धुमाळवाडी ,बर्वे वस्ती, अंबिका नगर, मेटकरी वस्ती यासह इतर पाच वस्त्यांना या योजनेचा फायदा होणार आहे. सदरच्या योजनेस तत्वतः मंजुरी मिळाल्यामुळे जवळा गावासह इतर वाडी वस्तीवरील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न पुढील ३० वर्षा पर्यंत मिटणार असल्यामुळे लोकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झालेले आहे.

फडणवीसांनंतर अजित पवारही सोलापूरच्या दौऱ्यावर

दिलीप माने यांच्या चिरंजीवांच्या विवाह समारंभाला लावणार उपस्थिती

सुराज्य/सोलापूर

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या आठवड्यात सोलापूर शहराचा दौरा केला. त्यानंतर आता विरोधी पक्षनेते अजित पवार हे येत्या गुरुवार, १ जून रोजी सोलापूर शहर व जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. माजी आमदार दिलीप माने यांचे चिरंजीव पृथ्वीराज माने यांच्या लग्न समारंभाला ते उपस्थिती दर्शवणार आहेत, सध्या तरी त्यांचा कोणताही राजकीय कार्यक्रम ठरला नाही मात्र अजित दादांचा हा दौरा आहे गाजणार असल्याची चर्चा आतापासूनच सुरू झाली आह.

आगामी लोकसभा विधानसभा आणि महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्व पक्षाकडून मोर्चे बांधणी सुरू होत आहे सर्वांचा फोकस यंदा सोलापूर वर दिसत आहे. या मे महिन्यात विविध पक्षातील लिकेज नेत्यांनी सोलापूर शहरात आणि जिल्ह्यात हजेरी लावली आहे सुरुवातीला राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी सोलापुरचा दौरा केला होता. या दौऱ्यात त्यांनी पंढरपूर, सांगोला व सोलापूर शहरातील कार्यक्रमांना हजेरी लावून जिल्ह्यातील राष्ट्रवादीत उत्साह निर्माण केला. तसेच अभिजीत पाटील यांचा राष्ट्रवादीमध्ये प्रवेश करून घेतला. या दौऱ्यामध्ये सोलापूर लोकसभा मतदारसंघ राष्ट्रवादीला सोडवून घ्यायचा का याबद्दलही चर्चा झाली. पवारांच्या या दौऱ्यानंतर शहर काँग्रेसनेही मेळावा घेत राष्ट्रवादीला सोलापूर मतदारसंघ तर न द्यायलहश ठरवलेच शिवाय माढा लोकसभा मतदारसंघावर ही दावा ठोकला. शहर काँग्रेसच्या या मेळाव्याला प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात आदी दिग्गज नेते मंडळी उपस्थित राहिले. मात्र हा दौरा गाजला तो नाना पटोले यांच्या स्वभावाच्या भाषेमुळे.

नाना पटोले यांच्या मेळाव्यापूर्वी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोलाप्रूचा दौरा केला. बावकुळेनंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही सोलापुरात हजेरी लावून शासकीय कार्यक्रमांसह भाजपचा मेळावा घेतला. या दौऱ्यातही फडणवीस यांनी भाजप शिवसेना युती सोलापूर शहर जिल्ह्यातील सर्व जागा एकत्र लढवणार असल्याची घोषणा केली तसेच कार्यकर्त्यांना महापालिका जिल्हा परिषदेवरही भाजपचा झेंडा फडकवण्याचे आवाहन केले. त्यांनतर कामगारमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी सोलापुरात येऊन भाजप कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला. शिवाय केंद्रीय मंत्री अजय सिंह हे सुध्दा माढा

दौऱ्यावर आहेत त्यांच्याकडे माढा लोकसभा मतदारसंघाची जबाबदारी देण्यात आली आहे.

सोलापूरच्या राजकारणातील प्रमुख तीन पक्षांचे वरिष्ठ नेते सोलापुरात येऊ लागल्याने कार्यकर्त्यांमध्ये निवडणूक तयारीचा उत्साह संचारू लागला आहे.

आता जून महिन्याच्या सुरुवातीलाच म्हणजे एक रोजी माजी उपमुख्यमंत्री अजित पवार हेही सोलापुरात येणार आहेत. माजी आमदार दिलीप माने यांचे चिरंजीव पृथ्वीराज यांचा एक जून रोजी विवाह आहे.

त्या विवाह समारंभाला अजितदादा उपस्थिती दर्शवणार आहेत. सध्या तरी त्यांचा कोणताही राजकीय कार्यक्रम ठरलेला नाही मात्र अजित दादा यांच्या या दौऱ्यात अनेक राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त करण्यात येत आह.

'पोचमपाड'ला उजनी समांतर जलवाहिनीची वर्कऑर्डर उद्या देणार

दीड वर्षात सोलापूरकरांना पाणी प्रश्न मिटण्याची आशा

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर दौऱ्यावर आलेले उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घोषणेनंतर सोलापूरकरांचा नियमित पाणीपुरवठ्याचा प्रश्न आता दीड वर्षात सुटणार आहे. सोलापूर ते उजनी संमातर जलवाहिनीचे काम नोव्हेंबर २०२४ पर्यंत पूर्ण करून देण्याची अट घालून कामाचा मक्ता आता 'पोचमपाड' कंपनीला दिला आहे. कंपनीला सोमवारी मक्तेदाराला नवीन वर्क ऑर्डर दिली जाणार आहे.

सोलापूर शहराला मागील २५ वर्षांपासून नियमित पाणीपुरवठ्याची प्रतीक्षा आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घालून लक्ष्मी व पोचपाड या दोन मक्तेदारांमधील लवादाकडील तिढा सोडविला आहे. पाकणी ते सोरेगावपर्यंत ११० 'एमएलडी'ची पाइपलाइन असणार असून त्याचे काम पूर्ण देखील झाले आहे. ६० एमएलडी पाणी पाकणी पंपहाऊसवरून उचलून थेट शहराला दिले जाणार आहे. पाकणी ते उजनी या अंतरावरील पाइपलाइन १७० 'एमएलडीचीच असणार आहे. तीन वर्षांपासूनचा समांतर जलवाहिनीचा वाद आता संपुष्टात आला असून कोल्हापूरच्या 'लक्ष्मी' कंपनीने भरलेली अनामत रक्कम परत दिली जाणार आहे. त्या मक्तेदाराने यापुढे कोर्टात किंवा लवादात जाणार नाही, असेही त्यांनी लेखी दिले आहे. ते काम पूर्ण झाल्यानंतर सोलापूरकरांना नियमित पाण्याची आशा आहे.

उजनी सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम सुरुवातीला ११० एम एल डी आणि त्यानंतर नव्या टेंडर प्रमाणे १%० एम एल डी काम करण्यात येणार आहे. लक्ष्मीला ६३% कोटी रुपये मध्ये या कामाचा मक्ता देण्यात आला होता. त्यानंतर आता तोडजोडीनंतर पोचमपाड कंपनी हे काम करणार आहे. २० कोटीने हे काम कमी करण्यात आले. नवं आणि जुनं असे मिळून एकूण ६६%.८३ कोटी रुपयांमध्ये हे काम पोचमपाड कंपनी करणार आहे. पोचमपाड कंपनीने यापूर्वी ५९ कोटी रुपयेचे काम आधीच केले आहे. ते पैसेही अदा करण्यात आले आहेत. एकूणच या प्रकल्पाची किंमत सध्या ६६%.८३ कोटी आहे.

उजनी सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम वेळेत किंबहुना तत्पूर्वी पूर्ण व्हावे असे प्रयत्न आहेत. त्यासाठी एकाच वेळी विविध ठिकाणी काम हाती घेण्याच्या सूचनाही करण्यात आल्या आहेत. या जलवाहिनीचे काम १८ महिन्यात पूर्ण करण्यात येणार आहे आणि तीन महिने परीक्षण (ट्रायल) साठी देण्यात येत आहेत असे एकूण २१ महिन्यातही जलवाहिनी कार्यान्वित होईल. येत्या दोन महिन्यात जॅकवेलचे काम करण्यात येणार आहे.

उपसभापती मामा पांढरे यांचा सत्कार

✔ **नातेपुते** : नातेपुते येथील अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती जननायक मामासाहेब पांढरे यांची अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या दुसऱ्यांदा उपसभापतीपदी फेरनिवड झाली. ही निवड झाल्याबद्दल बेळगांव (खानापूर) मतदार संघाचे माजी आमदार अरविंद पाटील यांनी मामा पांढरे यांच्या नातेपुते येथील संपर्क कार्यालयात येऊन मामा पांढरे यांचा सन्मान करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी मोहन वायमोडे संतोष निकम तसेच मामासाहेब प्रतिष्ठानचे कार्यकर्ते उपस्थित होते. नुकत्याच झालेल्या अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकींमध्ये अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे हे दुसऱ्यांदा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकींमध्ये निवडून आले होते पश्चिम भागात माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील तसेच सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तरुणांची चांगली फळी निर्माण केली आहे. मामा पांढरे हे मोहिते पाटील यांचे निकटवर्ती व विश्वासू मानले जातात त्यांची काम करण्याची धमक व कार्यकर्त्यांची जवळकता पाहून मामा पांढरे यांची परत दुसऱ्यांदा अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापती पदी निवड करण्यात आली. त्यांच्या या झालेल्या निवडीबद्दल राजकीय शैक्षणिक सामाजिक क्षेत्रातील नागरिकांनी त्यांचा सन्मान करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सनातन संस्थेच्या वतीने आज हिंदू एकदा दिंडी

✔ **सोलापूर** : सनातन संस्थेच्या वतीने सोलापूर येथे २८ मे रोजी हिंदू एकता दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती संघटनेचे हिरालाल तिवारी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. सनातन संस्थेचे संस्थापक सचिदानंद परब्रम्ह डॉक्टर जयंत आठवले यांच्या ८१ व्या जयंती जन्मोत्सवाच्या निमित्ताने संस्थेच्या वतीने हिंदू राष्ट्राच्या जागृतीसाठी हिंदू राष्ट्र जागृती अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या अंतर्गत सनातन संस्थेच्या वतीने रविवार २८ मे २०२३ या दिवशी सोलापूर येथे सायंकाळी पाच वाजता हिंदू एकदा दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. ही दिंडी सोलापूर येथील बाळवेस. येथून प्रारंभ होऊन चार हुतात्मा चौक येथे समारोह होणार आहे . हिंदू एकता दिंडीचा मार्ग प्रारंभ बाळवीस टिळक चौक मधला मारुती माणिक चौक दत्त चौक नवी पेठ सरस्वती चौक आणि त्यानंतर चार हुतात्मा चौक येथे समारोह होणार आहे.

देवकते प्रशालेच्या निकाल शंभर टक्के

✔ **सोलापूर** : आनंदराव देवकते माध्य व उच्च माध्य.प्रशाला वडजी ता.द. सोलापूर जि.सोलापूर उच्च माध्यमिक प्रशालेचा शंभर टक्के निकाल. प्रथम क्रमांक - वायमोडे रूपाली ६८.१७%, द्वितीय क्रमांक - घाडगे स्वाती ६६.८३ % ,तृतीय क्रमांक - हवालदार ऋतुजा ६६ % गुण घेऊन उत्तीर्ण झाल्याबाबत संस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय गजबार,संस्थेचे संस्थापक मार्गदर्शक विश्वास गजबार, शाळा समितीचे अध्यक्ष विठ्ठल हक्के, प्रशालेचे मुख्याध्यापक कल्याण गजबार,शाळा विभाग प्रमुख श्रीमंत हक्के,पालक,ग्रामस्थ, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने व सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक कार्यास शुभेच्छा दिल्या.

शहरातून दोन मोटार सायकलींची चोरी

✔ **सोलापूर** : सदर बझार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चावडी मस्जिद जवळ पार्क करून ठेवलेली दुचाकी क्र.एमएच.१३. सीपी.०१०४ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना १७ मे रोजी सायंकाळी घडली. याप्रकरणी इम्रान इब्राहिम झारेकरी (वय-३२,रा.उत्तर कसबा,दत्त चौक) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील पोसई तपास माळी हे करीत आहेत.तर दुसरी घटना ही फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बुधवार पेठ येथे हॅण्डल लॉक करून ठेवलेली फिर्यादी नितीन शिरीष ढगे (वय-३३,रा.भवानी पेठ) यांची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना २० ते २१ मे दरम्यान बुधवार पेठ येथे घडली.याप्रकरणी ढगे यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

हॉस्टेल मधून तरुणाचा मोबाईल पळवला

✔ **सोलापूर** : पार्क चौक येथील नेहरू हॉस्टेलमधील खोली नंबर ३० मध्ये फिर्यादी गणेश संतोष गव्हाणे (वय-१९,रा.सुभाष नगरबार्शी) हा झोपला असताना त्यावेळी अज्ञात चोरट्याने त्याच्या जवळील सात हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेला आहे.ही घटना २५ मे रोजी पहाटे पाच ते सकाळी आठ वाजण्याच्या दरम्यान घडली.गणेश गव्हाणे याने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्याच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक ढोबळे हे करीत आहेत.

साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

✔ **सोलापूर** : राहत्या घरात तरुणाने सिलिंग फॅनला साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन तरुणाने आत्महत्या केली.संदीप शांतमलप्पा इंगळे (वय-३०,रा.होटगी स्टेशन,दक्षिण सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या तरूणाचे नाव आहे.ही घटना शुक्रवारी उघडकीस आली.मृत संदीप याने राहत्या घरातील सिलिंग फॅनला शुक्रवारी दुपारच्या सुमारास गळफास घेतले.ही घटना दुपारी त्यांच्या कुटुंबियांना लक्षात आल्यानंतर त्याच्या गळ्या भोवतालचा फास काढून त्याला खाली उतरवून उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.दरम्यान,डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे. त्याने का आत्महत्या केली.याचा शोध पोलिसांकडून घेतला जात आहे.

दुचाकीला पाठीमागून ट्रकची धडक

✔ **सोलापूर** : फिर्यादी बसवराज शिवराज ब्यालीहाळ (वय-५०,रा. संगम नगर मुळेगाव रोड) हे त्यांची दुचाकी क्र.एमएच.१३.डीपी.९७३० यावरून जात असताना पाठीमागून येणाऱ्या हायवे ट्रक क्र.एमएच.१३. डीक्यू.४२९९ यातील चालकाने निष्काळजीपणाने व भरधाव वेगात वाहन चालवून फिर्यादी बसवराज यांच्या दुचाकीला धडक देऊन गंभीररित्या जखमी करत दुचाकीचे एक लाख रुपयांचे नुकसान करण्यास कारणीभूत झाला आहे.ही घटना दि.२५ मे रोजी दुपारी सव्वातीन वाजण्याच्या सुमारास लक्ष्मी चहा कॅन्टीन जुना बोरामणी नाका येथे घडली.याप्रकरणी बसवराज ब्यालीहाळ यांनी जेलरोड पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून धीरज अशोक निंबाळकर (वय-२६,रा. कोंडी) याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

बसव ब्रिगेडचे बसवरत्न पुरस्कार जाहीर

माजी मंत्री विनय कोरे यांच्या हस्ते बुधवारी वितरण

श्रीशैल (मामा) हत्तुरे | रमेश भुमे | सौ. राजश्री थळंगे | सोमनाथ जाणते | विशाल बगले | राहुल बुऱ्हाणपुरे | विजय बिज्जरगी | सौ. श्वेता डोंबे | साकव फाउंडेशन

✔ सुराज्य/सोलापूर

बसव ब्रिगेडतर्फे महेश (मुन्ना) थोबडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय बसवरत्न पुरस्कारांची घोषणा शनिवारी करण्यात आली. माजी मंत्री विनय कोरे यांच्या हस्ते बुधवारी (दि. ३१) सायंकाळी ५ वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे, अशी माहिती बसव ब्रिगेडचे सोलापूर शहर जिल्हाध्यक्ष अमित रोडगे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पुरस्काराचे हे दुसरे वर्ष असून बसव ब्रिगेडतर्फे सामाजिक कार्यकर्ते श्रीशैल हत्तुरे यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तर महाराष्ट्र जी. एस. टी. चे अतिरिक्त आयुक्त रमेश भुमे, युवा संशोधक राहुल राहुल बुऱ्हाणपुरे, विशाल बगले राजश्री थळंगे, सोमनाथ जाणते, श्वेता डोंबे, प्रा. विजय बिज्जरगी, साकव फाऊंडेशन यांना बसवरत्न पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. सन्मानचिन्ह, फेटा, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप असणार असेल.

याप्रसंगी बसव ब्रिगेडतर्फे विरभद्रप्पा जोजन, शशिकला रामपुरे, पौर्णिमा तोटड, अंजली शिरसी, रोहिणी चौधरी, शाम पाटील, उस्मान शेख, सिध्देश्वर प्रशाला माजी विद्यार्थी मित्र परिवार, नवनीत नडगेरी यांचा सामाजिक कार्यासाठी विशेष सन्मान करण्यात येणार आहे. तसेच जगतज्योती श्री महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाच्या निर्मितीत महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल सोलापूरकरांच्यावतीने बसव ब्रिगेडतर्फे माजीमंत्री विनय कोरे यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

या पुरस्कार वितरण सोहळ्यास बसव ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष अविनाश भोसीकर, तेलंगणा येथील लिंगायत नेते पी. संगमेश्वर, वेण्णा इश्वरप्पा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच माजी पालकमंत्री विजयकुमार देशमुख, आ. प्रणिती शिंदे, छत्रपती फाउंडेशनचे संतोष पवार, जि. प. सदस्य अमर पाटील, जयवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शिवाजी सावंत, शितल म्हेत्रे, माजी स्वागताध्यक्ष खलील शेख, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य जुबेर बागवान, एम. के. फाउंडेशनचे संस्थापक महादेव कोगनुरे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमात माजी मंत्री विनय कोरे यांचे जगतज्योती महात्मा श्री बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ या विषयावर मार्गदर्शन होणार आहे. या मार्गदर्शनाचा लाभ सोलापूरकरांनी घ्यावा आणि बसव ब्रिगेडच्या बसवरत्न पुरस्कार वितरण सोहळ्यास लिंगायत समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन बसव ब्रिगेडचे शहर जिल्हाध्यक्ष अमित रोडगे यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस बसव ब्रिगेडचे स्वागताध्यक्ष संतोष वायचळ, शिवराज विभूते, राहुल जत्ती, सुधाकर कोरे, जतिन निमगाव, ड. विनयकुमार कटारे, विशाल पाटील उपस्थित होते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन

✔ सुराज्य/सोलापूर

पुण्यश्लोक अहिल्यादेवींची २९८ वी जयंती ३१ मे रोजी राज्यात सर्वत्र मोठ्या हर्षोल्हासात साजरी केली जाणार आहे.पंढरपूर शहर व तालुका मध्यवर्ती समिती सालाबादप्रमाणे याही वर्षी राष्ट्रमाता, महाराणी अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा भव्यदिव्य नयनरम्य सोहळा याची देही याची डोळा पाहण्यासाठी व अहिल्यामातेस अभिवादन करण्यासाठी सर्वांनी ३१ मे रोजी सकाळी ९ वाजता सर्व प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी व डॉक्टर यांच्या शुभहस्ते प्रतिमा पुजन होणार असून दुपारी वृध्दाश्रम येथे मिष्टान्न भोजन तर १ जून रोजी सायं. पंढरपूर शहरातून प्रतिमेची मिरवणूक निघणार आहे असे आवाहन पंढरपूर शहर व तालुका मध्यवर्ती महोत्सव समितीने केले आहे.

उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून प्रतिमेचे पुजन पंढरपूर चे तहसीलदार सुशिलकुमार बेल्हेकर व त्यांच्या सुविद्य पत्नी यांच्या हस्ते तर उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, उपजिल्हाधिकारी समाधान घुटूकडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरूण फुगे, नगरपालिकेच्या मुख्याधिकारी अरविंद माळी,उप अभियंता संजय लवटे,श्री विठ्ठल मंदिर समितीचे व्यवस्थापक बालाजी पुदलवाड,एस एस थोरात, सहा. पोलिस निरीक्षक मनोज सोलनकर, शंकर वलेकर, शाखा अभियंता सदाशिव पुजारी, उमेश शिंदे महेश चौगुले व शहरातील सर्व डॉक्टर तसेच आ.समाधान आवताडे, मा.आ.प्रशांत परिचारक, विठ्ठल सहकारी चे चेअरमन अभिजीत पाटील, सहकार शिरोमणी चे चेअरमन कल्याणराव काळे,विठ्ठलाचे माजी चेअरमन भगिरथ भालके,शेतकरी कामगार पक्षाचे डॉ. बाबासाहेब देशमुख, दामाजी कारखान्यांचे व्हा.चेअरमन तानाजी खरात,सिताराम चे चेअरमन शिवाजीराव काळुंगे,भैरवनाथ शुगरचे अनिल सावंत, स्वेरी इंजिनिअरिंग कॉलेज चे सचिव बी.पी रोंगे,माजी नगराध्यक्षा साधनाताई भोसले, मनसेचे दिलीप धोत्रे, धनराज शिंदे, माजी उपनगराध्यक्ष नागेश भोसले, स्वेताताई डोंबे, भास्कर कसगावडे, संजय ननवरे, गणेश अंकुशराव,आदींच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

विश्राम धामची अवस्था बिकट

✔ सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत असलेल्या विश्राम धामची अवस्था बिकट झाली आहे. सदरील बांधकाम होवून ३५ वर्षे झाली. अद्यापही नव्याने विश्रामधाम नाही. हाती घेतलेले बांधकाम गेल्या वर्षभरापासून अर्धवट स्थितीत असल्याने बांधकाम विभागाच्या कारभाराबाबत तीव्र तिखट प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.

राज्यातील टॉप फाईव्हमधील अक्कलकोट तीर्थक्षेत्र असताना शासनाच्या विविध योजनांपासून वंचित तालुका हे पुसून काढण्याकामी आमदार सचिन कल्याणशेट्टी हे विविध माध्यमातून कार्यरत आहेत. गेल्या अनेक वर्षापासूनचा बॅकलॉग भरुन काढणेकामी शासनाच्या विविध योजना आणून त्या राबविणेकामी प्राधान्य दिले जात आहे. त्यांच्या या आमदारकीच्या काळात अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील जनतेला अच्छे दिन बघण्याचा योग येत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग हे अक्कलकोट तालुक्याकरिता चोहोबाजुच्या राष्ट्रीय महामार्गामुळे या विभागाचे स्थान नगण्य ठरत असल्याने तेथील अधिकारी व कर्मचारी आयाराम-गयाराम अशी स्थिती निर्माण झालेली आहे. गेल्या ३५ वर्षामध्ये सार्वजनिक बांधकाम खात्याचे नव्याने विश्राम धाम होवू शकले नाही, ही खेदाची बाब आहे. स्वामी भक्तांचे राज्यासह परराज्य, परदेशातून येणाऱ्या स्वामी भक्तांचा लोंढा वाढत चालालेला असताना सार्वजनिक बांधकाम विभागाची अवदासिन स्थिती बाबत भक्तांतून देखील राग व्यक्त होत आहे.

सदर विश्राम धाम बांधणाऱ्या ठेकेदाराने २ कोटी १९ लाख ४५ हजार रुपयाचे काम घेतलेले आहे.

गेल्या काही दिवसापूर्वी राज्यासह परराज्यातील काही उच्चस्पद अधिकारी, खंडपीठ, उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींना देखील विश्राम धामच्या अवस्थेबाबत ताशेरे ओढले आहेत. असे असताना देखील अद्यापही राज्याचे सार्वजनिक बांधकाम सचिव, मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपअभियंता आजमितीस बघ्याची भूमिका घेतल्याची स्पष्ट होत आहे.

सोलापूरचा उमेद विभाग राज्यात अग्रेसर ठेवा : सीईओ स्वामी

✔ सुराज्य/सोलापूर

उमेद अभियानात सोलापूर जिल्हा परिषदेचा उमेद विभाग राज्यांत दुसरे क्रमांकावर आहे. तो राज्यांत अग्रेसर ठेवा असे आवाहन सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

सोलापूर व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभाग यांचे संयुक्त विद्यमान् बँक कर्ज वाटप व आर्थिक साक्षरता शिबिराचे आयोजन शहरातील निर्मलकुमार फडकुले सभागृहात आयोजन करणेत आले होते. या प्रंसगी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभागाचे प्रकल्प संचालक उमेशचंद्र कुलकर्णी, जिल्हा अग्रणी बँकेचे प्रशांत नाशिककर, संचालक दिपक वाडेवाले, व्याख्यात्ते शिवाजीराव पवार, जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, प्रमुख उपस्थित होते.

महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होणे आवश्यक असल्याचे सांगून सिईओ दिलीप स्वामी म्हणाले, महिला सक्षमच आहेत. सर्व बचतगट अध्यक्षा, सचिव अधिक सक्षम झालेस अधिक कामांना गती येईल. व्यक्तीमत्व विकास हा शेवट पर्यंत करता येतो. वाचन, लेखन, पशु पक्षी यांचे पासून ज्ञान मिळते. जिवनाकडे येणारे प्रसंगाकडे सकारात्मक रहा. आपले व्यक्तीमत्व सकारात्मक ठेवा. असेही सिईओ दिलीप स्वामी यांनी सांगितले.

निरोगी शरीरात निरोगी मन असते. खुल्या हवेत फिरा. वेळेवर आहार घ्या. सुर्यप्रकाश घ्या. जास्तीत जास्त पाणी प्या. व्यायाम करा. महिलांनो आरोग्याची काळजी घ्या. ज्यात तुम्हाला मन मोकळे वाटते त्या साठी संगीत ऐका. असेही सिईओ दिलीप स्वामी यांनी सांगितले. व्याख्यात्ते शिवाजीराव पवार यांनी राष्ट्र उभारणी मध्ये महिलांचे योगदान मोठे आहे. सर्व विविध प्रकारामध्ये उत्कृष्ट काम केले बद्दल उत्तर सोलापूर तालुका व जिल्हा टीम चा सत्कार करणेत आला.

शासनाच्या कल्याणकारी योजनांची बार्शीत अंमलबजावणी

सर्व खात्यांचा घेतला आढावा

✔ सुराज्य/बार्शी

केंद्र व राज्य सरकारने सर्वसामान्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी विविध योजना आणल्या आहेत. या योजनांची बार्शी तालुक्यात चांगली अंमलबजावणी होत असून बार्शीत विकासाच्या अनुषंगाने चांगला बदल दिसत आहे असे मत केंद्रीय गृहराज्यमंत्री अमित मिश्रा यांनी व्यक्त केले.

लोकसभा प्रवास दौऱ्या अंतर्गत दोन दिवसापासून राज्यमंत्री मिश्रा हे बार्शी शहराच्या दौऱ्यावर आहेत. या दरम्यान पत्रकाराची संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी धाराशिव लोकसभा संपर्कप्रमुख आमदार राणाजगजीतसिंह पाटील, आमदार राजेंद्र राऊत, माजी नगराध्यक्ष असिफ तांबोळी, रमेश पाटील, मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, प्रभारी तहसीलदार अंजली मरोड, आदी उपस्थित होते.

मंत्री मिश्रा म्हणाले, गेल्या दोन दिवसात आम्ही शासनाच्या वतीने राबवण्यात येत असलेल्या विविध योजनांचा आढावा घेतला. कार्यकर्त्यांशी संवाद साधला. सर्वसामान्य माणसाला घरे, रस्ते, हॉस्पिटल आदी सह मूलभूत विकास केला जात आहे. बार्शी शहर चांगल्या पद्धतीने विकसित झालेले शहर असून या ठिकाणचा सर्व विकास पाहता आमदार राजेंद्र राऊत यांचे काम चांगले असल्याचे कौतुकही त्यांनी यावेळी केले. प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत देशातील ४० कोटी शेतकऱ्यांनी याचा लाभ घेतला असल्याचेही मिश्रा यांनी यावेळी सांगितले. सरकारी बँका पंतप्रधान पीक विमा योजनेचा हप्ता भरून घेत नाहीत या प्रश्नावर त्यांनी संबंधितांना सूचना देवू असे आश्वासित केले.

केंद्र सरकार तरुणांच्या हातांना रोजगार देण्यासाठीही नेहमीच प्रयत्नशील असल्याचे सांगत आपली अर्थव्यवस्था मजबूत होत आहे. तसेच गुंतवणूक ही वाढत आहे. त्यामुळे भविष्यात देखील तरुणांच्या हाताला निश्चितपणे रोजगार मिळेल असा विश्वास व्यक्त केला. मुद्रा लोन, एमआयडीसी मधील उद्योग आदी प्रश्नांवरही मिश्रा यांनी यावेळी सकारात्मक उत्तरे दिली.

दरम्यान मिश्रा यांनी आज सकाळी श्री भगवंत मंदिरात जाऊन भगवंताचे दर्शन घेतले. त्यानंतर बार्शी नगरपालिकेच्या वतीने प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत धस पिंपळगाव रोडवर सुरू असलेल्या १५९६ घराच्या प्रकल्पाला भेट देऊन पाहणी केली. एक वर्षाच्या आत हे काम पूर्ण करावे अशा सूचना त्यांनी यावेळी प्रकल्प प्रमुख व नगरपरिषदेला केल्या. नगरपरिषदेमध्ये तालुक्यातील सर्व खात्यांच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेऊन केंद्र व राज्याच्या योजना व काम करताना येणाऱ्या अडचणी जाणून घेऊन योग्य त्या सूचना दिल्या. त्यांनी बार्शी रेल्वे स्टेशनलाही भेट देऊन तेथील समस्यांचा व जाणाऱ्या येणाऱ्या गाड्यांची माहिती घेतली. बार्शी टेक्स्टाईल मिलला भेट देऊन लवकर ही मिल सुरू करण्यासाठी केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री पियुष गोयल यांच्यासोबत बैठक लावून चालू करण्यासंदर्भात प्रयत्न करू अशी ग्वाही त्यांनी कामगारांना दिली. यावेळी सर्वखात्यांचे प्रमुख अधिकारी, भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

उपेक्षित समाजातील कुटुंबाच्या घरी त्यांनी रात्रीचे जेवण शहरातील उपेक्षित समाजातील कुटुंबाच्या घरी त्यांनी रात्रीचे जेवण केले. नागजी अडसूळ, तायप्पा वायमोडे यांनी जेवणाची सोय केली. तसेच तत्पूर्वी माजी गटनेते दिपक राऊत यांच्या निवासस्थानी मंत्री मिश्रा यांच्या उपस्थितीत बुथ कार्यकर्त्यांची बैठक झाली. यात त्यांनी भाजप बुथ कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

रेल्वे उड्डाण पुलाच्या कामासाठी सर्व पक्षीय नेत्यांनी पुढाकार घ्यावा : डॉ. शांतलिंगेश्वर महास्वामीजी

सुराज्य/अक्कलकोट

महाराष्ट्र व कर्नाटक राज्याला जोडणाऱ्या दुधनीजवळील रेल्वे उड्डाणपुलाचे काम मागील अनेक वर्षांपासून रखडले आहे. यामुळे या मार्गावर प्रवास करणाऱ्या वाहन धारकाना मोठा मनस्ताप सहन करावं लागत आहे. यातून सुटका मिळविण्यासाठी रेल्वे उड्डाण पूलाच्या कामाला त्वरित सुरुवात होणे गरजेचे आहे. यासाठी सर्व पक्षीय नेत्यांनी पुढाकार घ्यावे, असे आवाहन दुधनी विरक्त मठाचे मठाधिपती डॉ. शांतलिंगेश्वर महास्वामीजी यांनी केले. ते एका कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलत होते.

दुधनी येथील हानगल्ल गुरूकुमारेश्वर फायनान्सच्यावतीने दुधनी शहर भाजपचे अध्यक्ष सातलिंगप्पा उर्फ अप्पू परमशेट्टी यांची दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी, भाजपचे माजी नगरसेवक महेश पाटील यांची श्री स्वामीसमर्थ साखर कारखानेच्या संचालकपदी व आडत व्यापारी गटातून चंद्रकांत येगदी आणि सातलिंग परमशेट्टी यांची संचालक म्हणून बिनविरोध झाल्याबद्दल फेटाबांधून डॉ. शांतलिंगेश्वर महा स्वामीजी यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात श्री हानगल्ल गुरूकुमारेश्वर व लिं. शांतलिंगेश्वर महास्वामीजी यांच्या प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी मंचावर दुधनी नगर

परिषदेचे माजी नगसेवक शिवानंद माड्याळ, सिध्दराम येगदी, अतुल मेळकुंदे, बसवराज मगी यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना स्वामीजी म्हणाले की, दुधनी शहर हा सोलापूर - गुलबर्गा या दोन जिल्ह्यांना जोडणारा महाद्वार आहे. या महामार्गावरून रोज हजारो गाडया धावतात. सरासरी २४ तासामध्ये १२ तास तर गेट बंदच असतो. यामुळे सतत वाहतुकीची कोंडी होवून जड वाहनासह इतर वाहनांच्या फाटकाच्या दोन्ही बाजुला रांगा लागलेली असतात. यामुळे इंधनासह या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशयांची वेळ वाया जात आहे. यासाठी रेल्वे क्रॉसिंगवर उड्डाणपुल बांधून वाहतुकीची कोंडी सोडवावी, अशी मागणी अनेक दिवसांपासून होत आहे. यावेळी इरय्या पुराणिक, शिवराया अल्लापुर, शंकर भांजी, महानिंगय्या बाहेरमठ,गुरुपादय्या सालीमठ, शिवानंद बिंजगेरी, शरणबसप्पा शिलवंत, जगदीश हौदे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन शांतेश धोडमनी यांनी तर आभार सुगुरेश बाहेरमठ मानले.

व्यापाऱ्यांतर्फे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

अक्कलकोट : नाले सफाई व मुख्य नाल्यावरील अतिक्रमण हटवण्या संदर्भात शहरातील मुख्य बाजारपेठेतील व्यापऱ्यांच्यावतीने मुख्याधिकारी आतिष आळूंज यांना लेखी निवेदन देण्यात आले.

गेल्यावर्षी सप्टेंबर महिन्यात दुधनी शहर आणि परिसरात रात्री ११ ते १ वाजे दरम्यान दगफुटी सदृश्य पाऊस पडला होता. यामुळे शहरातील मुख्य बाजार पेठेतील दुकानांसह अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने अनेक लोक बेघर झाले होते तर लाखों रुपयांचे नुकसान झाले होते. आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार सिध्दाराम म्हेत्रे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शंकर म्हेत्रे, माजी सभापती प्रथमेश म्हेत्रे, तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांनी नुकसानीचे पाहणी केली होती.यावेळी अनेक व्यापाऱ्यांनी नाल्यावरील अतिक्रमण संदर्भात गाहाणी मांडले होते. त्यानंतर आमदार कल्याणशेट्टी यांनी पक्षपाती न करता कारवाई करण्याचे आदेश तहसीलदार बाळसाहेब सिरसट यांना दिले होते. मात्र अद्याप एक वर्ष उलटून गेले तरी नगरपरिषदेकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. या पार्श्वभूमीवर पावसाळा सुरू होण्यापूर्वी नाले सफाईसह मुख्य नाल्याभोवती झालेले अतिक्रमण हटविण्यात यावी अशी मागणी दुधनीतील व्यापाऱ्यांच्या निवेदनाद्वारे करण्यात आले.

यावेळी मुख्याधिकारी आतिष वाळूंज बोलताना म्हणाले की, पावसाळा सुरू होण्यापूर्वी जी कामे करायची आहे त्याची अमलबजावणी सध्या सुरू आहे. योग्य ती खबरदारी घेतली जात आहे. तर यावर्षी शहरात पाणी तुंबणार नाही याची आम्ही खबरदारी घेतली आहे. गेल्यावेळी जी त्रुटि आढळून आले आहेत त्या संदर्भातील काही कामांच्या मंजूरीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आले आहेत. त्या कामांना अद्याप मंजूरी मिळाली नाही असे सांगितले. यावेळी अनंत कासार, मल्लिनाथ मातोळी, दौलत हौदे, गुरुशांत माशाळ, मल्लिनाथ तुप्पद, आनंद बाहेरमठ, श्रीकांत भांजी, चन्नप्पा ओनामशेट्टी, शिवराज साणक, संजय मणुरे, शरणप्पा कोटणुर, रमेश चव्हाणसह बाजार पेठेतील व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

वादळी वाऱ्यामुळे आंब्याचे झाड पडून दोन शेळ्या ठार

पिलीव : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे २६ मे रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास झालेल्या वादळी वाऱ्यामुळे लक्ष्मीनगर येथील अण्णा गुलाब सुळे यांच्या शेळया विसाव्यासाठी आंब्याच्या झाडाखाली बसलेल्या असताना आंब्याचे झाड पडल्यामुळे दोन शेळया जागीच ठार झाल्या तर एक शेळी जखमी झाली. तर याचवेळी त्या आंब्याच्या झाडावर महावितरणचा पोलही पडला सूदैवाने यावेळी विदयुत प्रवाह सुरू नव्हता त्यामुळे मोठा अनर्थ टळला.कारण शेळयांचा मोठा कळप व राखण करणारे यावेळी त्या झाडाखालीच थांबले होते. सदरच्या घटनेचा पिलीवचे तलाठी अनील चव्हाण यांनी तसेच पशुवैदयकीय अधिकारी शेंडगे यांनी रितसर पंचनामा केला असुन अहवाल शासनास पाठविला आहे. मृत शेळयाचे शवविच्छेदन करणयात आले तसेच जखमी शेळीवर उपचार करणयात आला. त्याचा अहवाल पुढील कार्यवाही साठी पाठविणयात आला आहे. सध्या जोरदार वादळी वारे तसेच विजांचा कडकडाट पाहवयास मिळत आहे त्यामुळे नागरिकांनी आपली जनावरे ,शेळया यांची काळजी घेणे आवश्यक आहे. झाडाखाली व महावितरणच्या पोल्जवळ जनावरे बांधणे टाळुन काळजी घेणे आवश्यक आहे.

शासन आपल्या दारी या कार्यक्रमात देशमुख यांच्या हस्ते अयाज यांचा सन्मान

सोलापूर : नुकतेच दक्षिण सोलापूर मंद्रुप येथील शासन आपल्या दारी या कार्यक्रमात आमदार सुभाष बापू देशमुख यांच्या हस्ते सोलापूर जिल्हा चे ब्रॅन्ड अ्मबेसिडर पदी नियुक्ती झाल्याबद्दल मंद्रुप चे भूमिपुत्र गायक मोहंम्मद अयाज यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी खासदार महास्वामी जय सिध्देश्वर महाराज प्रांत अधिकारी अमित देशमुख, तहसीलदार राजशेखर लींबारे, सरपंच अनिता कोरे, कृषी अधिकारी माळगे , आरोग्य अधिकारी नलवडे मंडम, अप्पाराव पाटील, माजी सभापती गुरुसिध्द म्हेत्रे सह हजारो ग्रामस्थ उपस्थित होते या वेळी मोहम्मद अयाज जय जय महाराष्ट्र माझा गर्जा माझा हे गीत सादर करुन प्रशासन व मंद्रुप करांचे आभार मानले

बोरामणीत दत्त मंदिर कळसारोहण व शिवलिंग प्रतिष्ठापना

सुराज्य/सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी येथे दत्त मंदीर कळसारोहण व शिवलिंग प -तिष्ठापना गुरुवारी मोठ्या उत्साहात करण्यात आली. यनिमित्ताने २१ ते २५ मे दरम्यान रोज अखंड हरिनाम सप्ताहही आयोजित करण्यात आला होता. या निमित्ताने रोज पहाटे चार ते सहा या वेळेत मंदिरात काकडा आरती, ६ ते ७ दत्त पूजाभिषेक, साडेसात ते साडेनउ ज्ञानेश्वरी पारायण, दहा ते बारा गाथा भजन, चार ते पाच प्रवचन, पाच ते सहा हरिपाठ, सहा ते सात नामजप व सात ते नउ या वेळेत नामसंकीर्तनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

२१ मे रोजी हभप बंडोपंत महाराज, देगाव यांचे प्रवचन झाले. थर गुरु बापूसाहेब देहुकर महाराज यांचे नामसंकीर्तन झाले. २२ मे रोजी हभप बाबुराव काळजे महाराज, देगाव यांचे प्रवचन व महेश देहुकर महाराज यांचे नामकिर्तन झाले. २३ मे रोजी हभप केशव गुरव महाराज यांचे प्रवचन व कान्होबा देहुकर महाराज यांचे नामसंकीर्तन झाले.

२४ मे रोजी हभप गंगाधर धोटकर महाराज तामलवाडी यांचे प्रवचन तर हरिप -साद देहुकर महाराज यांचे नामसंकीर्तन झाले. गुरुवार २५ मे रोजी होमहवन विधी झाला. यानंतर ब्रह्मचारी शाम शंकर गिरीमहाराज भालकी यांच्या हस्ते दत्त मंदिराचे कळसारोहण व शिवलिंग प्रतिष्ठापना करण्यात आली. याप्रसंगी बाळासाहेब देहुकर महाराज, पंढरपूर यांचा नामसंकीर्तनाचा कार्यक्रम झाला. शुक्रवार २६ मे रोजी सकाळी बाळासाहेब देहुकर महाराज पंढरपूर यांचे काल्याचे किर्तन झाले. नंतर उपस्थित भक्तांना औदुंबर कवडे यांच्या वतीने महाप्रसाद वाटप करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी देहुकर सांप्रदायिक भजनी मंडळ व छत्रपती प्रतिष्ठानचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला. यावेळी अनंत गोसावी, भारत कवडे, बंडू मस्के, औदुंबर कवडे, मल्लिनाथ साखरे, पंडित मस्के, नाना भोसले,श्रीकांत मोरे, बाळू चव्हाण, विकास भोसले, शितल मस्के यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

चारित्र्यावर संशय घेत पत्नीचा छळ ; पतीसह चौघांवर गुन्हा

सोलापूर : चारित्र्यावर संशय येत पत्नीचा छळ केल्याप्रकरणी पतीसह चौघांवर जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत साधना सचिन दलभंजन (वय-४२,रा.साखर पेठ) यांनी फिर्याद दिली आहे.

फिर्यादी साधना यांचे २०१२ मध्ये सचिन दलभंजन याच्यासोबत विवाह झाला होता.विवाहानंतर त्याच्या कुटुंबियांनी साधना यांच्या चारित्र्यावर संशय येत त्यांचे डोके भिंतीवर आपटले.शिवाय त्यांना शारीरिक व मानसिक त्रास दिले. शिवाय शेअर मार्केट मध्ये गुंतवण्यासाठी १ लाख रूपये घेऊन ये म्हणत पत्नीचा छळ केला, अशा आशयाची फिर्याद साधना यांनी दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती सचिन दलभंजन, विजया दलभंजन, नितीन दलभंजन, दीपाली दलभंजन (सर्व रा.गोदावरी अपार्टमेंट,सिंहगड रोड,पूणे) यांच्यावर कौटुंबिक हिंसाचाराचा गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा तपास पोलीस नाईक मस्के करत आहेत.

अहिल्यादेवीच्या जयंतीनिमित्त सांगोल्यात विविध कार्यक्रम

सुराज्य/सांगोला

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या २९८ व्या जयंती निमित्त सांगोला येथे मंगळवार दि.३० मे व बुधवार दि.३१ मे २०२३ रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती अध्यक्ष आकाश व्हटे यांनी दिली.

मंगळवार दि.३० रोजी सकाळी १० पु.राजमाता अहिल्यादेवी प्रतिमेचे पूजन व पुतळ्यास पुष्पहार अर्पण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी माजी नगराध्यक्षा सौ. राणीताई माने, डॉ.निकिताताई देशमुख, माजी सभापती सौ.राणीताई कोळवले, महिला सूत गिरणी व्हा.चेअरमन श्रीमती कल्पनाताई शिंगाडे, माजी नगरसेविका सौ.छायाताई मेटकरी, माजी नगरसेविका सौ.स्वातीताई मस्के, महिला सूत गिरणी संचालिका सौ.मिनाक्षीताई येडगे, सौ.वैशालीताई मदने, सौ.उषाताई देशमुख, सौ.शारदाताई मस्के, धनगर समाज सेवा महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ.रुपालीताई मदने यांच्यासह सर्व आजी, माजी नगरसेवक, नगरसेविका व मान्यवर उपस्थितीत राहणार आहेत.

मंगळवार दि.३० रोजी स.१०.३० वा. समाजप्रबोधन व मार्गदर्शन होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पुरोगामी युवक संघटना महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष डॉ.भाई.बाबासाहेब देशमुख हे भूषविणार असून प्रमुख पाहुणे म्हणून आ.गोपीचंद पडळकर, आ.शहाजीबापू पाटील, चंद्रकांत देशमुख, डॉ.अनिकेत देशमुख, प्रा.निवांत कोळेकर, प्रा.लक्ष्मण हाके, मा.नगरसेवक आनंदा माने, दगडु संभाजी गावडे उपस्थित राहणार आहेत.

नातेपुतेत बारावी परीक्षेत १०० टक्के निकालाची परंपरा कायम

सुराज्य/नातेपुते

नातेपुतेमधील कनिष्ठ महाविद्यालयांनी शंभर टक्के निकालाची यशाची परंपरा यंदाच्या वर्षीही कायम राखली आहे.

यामध्ये डॉ. बाळकृष्ण जयवंत दाते प्रशाला व नातेपुते कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ७८ टक्के लागला आहे. शास्त्र शाखेचा निकाल ८०.१४ टक्के, कला शाखेचा ६५.४० टक्के व वाणिज्य शाखेचा ९५.९१ टक्के निकाल लागला त्यात शास्त्र शाखेत शिवानी चेतन लाळगे ८५.१७ टक्के, आरती बालू खिलारे ८२.१७ टक्के, आनंद किसन गोरे ७८ टक्के, वाणिज्य शाखेतून रेणुका रवींद्र बरडकर ८५.१७ टक्के, सलोनी धनंजय सोरटे ८१.३३ टक्के नीलेश संजय आवळे ८०.६७ टक्के, स्नेहल राहुल घाडगे ८०.६७ टक्के, कला शाखेत निकिता मोहन कदम ७८.५० टक्के, पल्लवी प्रदीप कर्चे ७६ टक्के, सोनाली हनुमंत रुपनवर ७२.१७ टक्के गुण मिळवून यश मिळविले आहे. सहकारमहर्षी शंकरराव मोहिते- पाटील कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल १७.५१ टक्के लागला आहे. त्यात शास्त्र शाखेचा १०० टक्के, कला शाखेचा ८८.६३ टक्के वाणिज्य शाखेचा १०० टक्के निकाल लागला. यामध्ये शास्त्र शाखेत पिंकी आण्णा नरबट हिने ८०.३३ टक्के, साहिल राजेंद्र काटकर ७३.५० टक्के, शिवानी आप्पा वायमोडे ७३.३३ टक्के वाणिज्य शाखेत स्वाती राजेंद्र रणदिवे ८१ टक्के, ऋतुजा संपादन केले. विजय तडाखे ७५ टक्के, हर्षद चंद्रशेखर दोभाडा ७३.३३ टक्के, कला शाखा अभिषेक चंद्रकांत सोडमिसे ७४ टक्के, सुप्रिया अर्जुन जाधव ६९.८३ टक्के, आरती विजय होळकर ६७.८३ टक्के मिळवून अनुक्रमे प्रथम, द्वितीय तृतीय क्रमांक मिळविले आहे.चंद्रकांत युगरदरे प्रशाला व ज्युनिअर कॉलेजचा निकाल ९६.३९ टक्के लागला आहे. शास्त्र शाखेचा निकाल १०० टक्के, कला शाखेचा १८८.८८ टक्के लागलेला आहे. यामध्ये शास्त्र शाखेत सानिया नाजमोद्दिन मुलानी ७५ टक्के, निकिता दाजीराम ठोंबरे ७४.५० टक्के, संजना विजय साळी ७३.१७ टक्के, कला शाखेत रविना लक्ष्मण कदम ८०० टक्के अल्फिया सादिक बागवान ७७.३३ टक्के, मनश्री बाळासो जाधव ७३.३३ टक्के गुण मिळवून अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक मिळवले आहे. रत्नप्रभादेवी मोहिते पाटील कन्या प्रशालेचा निकाल १०० टक्के लागला आहे.

आडत यांची महाराष्ट्र पोलीसपदी निवड झाल्याबद्दल सत्कार

सुराज्य/वेळापूर

वेळापूर आडत मळा येथील माजी सैनिक भागवत महादेव आडत यांचे चिरंजीव दत्तात्रय भागवत आडत यांची सोलापूर शहर येथे महाराष्ट्र पोलीसपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा वेळापूर गरुड बंगला येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते तथा अकलूज मार्केट कमिटीचे नूतन संचालक उत्तमराव जानकर यांच्या वतीने हार घालून फेटा बांधून पेढा भरवून सत्कार करण्यात आला यावेळी बोलताना उत्तमराव जानकर म्हणाले की ज्याप्रमाणे मेजर भागवत गायकवाड यांनी कष्टातून जिद्द दाखवून ज्याप्रमाणे ते मिलिटरीत भरती झाले, देशाची सेवा करुन कार्यकाळ पुर्ण केला, हीच जिद्द आणि कष्ट त्यांचे चिरंजीव दत्तात्रय आडत यांनी दाखवून प्रामाणिकपणे प्रयत्न केल्यानेच दत्तात्रेय आडत यांची महाराष्ट्र पोलिसपदी निवड झाली असून त्यांना मिळालेल्या संधीचे सोने करावे आणि आपल्या परिवाराचे व गावाचे नाव उज्वल करावे असे उत्तमराव जानकर यांनी सांगून दत्तात्रय आडत याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी जेष्ठ काशिनाथबापू आडत, मल्हारीमामा शिंदे, महादेव म्हेत्रे, मेजर भागवत आडत, मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब घाडगे, विश्वास वाघे, शंकर आडत ,जीवन वाघे, विष्णु आडत, अमोल पनासे, सूर्यकांत मोहिते यांच्यासह माळी समाज बांधव व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते .

लोकविकासचा विज्ञान शाखेचा निकाल शंभर टक्के

सुराज्य/वेळापूर

येथील लोकविकास शिक्षण प्रसारक संस्था संचलित लोकविकास जुनियर कॉलेज वेळापूर बारावी विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के तर वाणिज्य विभागाचा ८७.५० टक्के लागला व चांगल्या यशाची परंपरा संस्थेने राखली आहे.

विज्ञान विभागातून प्रथम क्रमांक सिध्दराज शिंदे ८०.०० टक्के ,द्वितीय क्रमांक धनराज ननवरे ७९.८३ टक्के व तृतीय क्रमांक आकाश जगताप ७५.०० टक्के यांनी तर वाणिज्य विभागातून प्रथम क्रमांक अमृता शिंदे ७४.३३ टक्के , द्वितीय क्रमांक पूजा पिसे ६८.६७ टक्के व तृतीय क्रमांक संध्या गायकवाड६६.८३ टक्के यांनी पटकावले. ज्युनिअर कॉलेजच्या सायन्स विभागामध्ये ए ग्रुप, बी ग्रुप, ए प्लस ग्रुप मध्ये २०० मार्क्स इलेक्ट्रॉनिक्स तसेच बी प्लस ग्रुप मध्ये २०० मार्क्स क्रॉप सायन्स हे विषय चालू आहेत.

प्राचार्य अमोल पांढरे, राहुल बनकर, अजित बनकर, सचिन साळुंखे, अमोल साठे, भालचंद्र साठे, सिनाप्पा शेंडगे, विजया चापले, मोनिका माने, संस्थापक जालिंदर बनकर, अध्यक्षा वैशाली बनकर, सचिव चंद्रकांत नवले यांनी अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

दुधनीत मारहाण तिघे जखमी

सोलापूर : घराजवळ पती-पत्नीचे भांडण सोडविण्यास गेले असता, तुम्ही मध्ये का पडला? असे म्हणत दगड वीट आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत २ महिलासह तिघेजण जखमी झाले. ही घटना दुधनी (ता.अक्कलकोट) येथे घडली. इरण्णा जतगुंडा त्याची आई महानंदा जतगुंडा (रा. अंकलगी गुलबर्गा) आणि लक्ष्मी पुजारी (रा. दुधनी अक्कलकोट) अशी जखमींची नावे आहेत.

सुराज्य Classified सोलापूर
विवाह विषयक
वधु २६, उंची ५.३, गोरी, शिक्षण १० वी, हिंदु जैन, वडील नाहीत. आई-मुलीचे सुंगधीत धुप, अगरबत्तीचे होलसेल दुकान, शेती ३ एकर, मुलीकरीता सर्वजातीय सामान्य वर चालेल.
संपर्क : 7028536999
7517049173
(290523)

मोहोळ प्रशासनाला खासदारांच्या नावाचा विसर

तहसीलदार प्रशांत बेडसे यांचा भाजपाने केला निषेध

सुराज्य/मोहोळ

मोहोळ येथे झालेल्या शासन आपल्या दारी या कार्यक्रमात महसूल प्रशासनाने सत्ताधारी भाजपाचे खासदार यांच्या नावाचा

उल्लेख टाळला यामुळे भाजपाच्या वतीने तहसिलदार प्रशांत बेंडसे यांचा निषेध केला.

मोहोळ महसूल विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या कार्यक्रम पत्रिकेवर मोहोळ तालुक्याचे प्रतिनिधित्व करणारे खासदार जयसिध्देश्वर महास्वामी यांच्या नावाचा उल्लेख जाणिवपूर्वक टाळलेला आहे. दरम्यान याप्रकरणी भाजपचे मोहोळ शहर अध्यक्ष सुशिल क्षिरसागर व युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष अंकुश अवताडे यांनी जिल्हाधिकारी सोलापूर यांना भेटून याप्रकरणी योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्याची मागणी करणारे पत्र दिले आहे खा. जयसिध्देश्वर महास्वामि व भाजपा सोलापूर जिल्हा अध्यक्ष आमदार सचीन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली मोहोळ तालुका भाजपा शिष्टमंडळाद्वारे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूल मंत्री यांना लवकरच भेटून या प्रकरणी कारवाई करण्याची लेखी मागणीही करणार असल्याचे भाजपाचे मोहोळ शहर अध्यक्ष सुशील क्षिरसागर यांनी सांगितले.

नागरिकांनीच वाचून दाखवला ग्रामपंचायतीच्या भोंगळ कारभाराचा पाढा

सुराज्य/चिखली

ग्रामपंचायत प्रशासनाला अनेकदा सांगून देखील गावात पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात येत नाही. गावातील गल्लीबोळातील रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. वस्तीवरील रस्त्यांवर मुरुमीकरण देखील केले जात नसल्याचा आरोप करत नागरिकांनी ग्रामसभेत राडा घालून ग्रामपंचायत प्रशासनाच्या भोंगळ कारभाराचा पंचावन्नचा पाढा वाचून दाखवत ग्रामपंचायत प्रशासनाला धारेवर धरले.

मोहोळ तालुक्यातील चिखली येथील ग्रामपंचायतीची ग्रामसभा सरपंच बाळू मेंढे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. वस्त्यांवरील रस्त्यावर मुरुमीकरण करण्यात यावे. गावात पिण्याच्या पाण्याची पाईप लाईनचे काम करताना अनेक ठिकाणी सिमेंट कॉक्रेटचे रस्ते उचकटलेले आहेत. सगळीकडे रस्त्यांची दाणादाण उडाली आहे. रस्त्याची अवस्था पावसाळ्यात दयनीय अवस्था होण्याअगोदर उचकटलेले सिमेंट कॉक्रेटचे रस्ते त्वरित दुरुस्त करण्याचे काम हाती घेण्यात यावे. तसेच गेल्या दोन तीन महिन्यांपासून गावात पिण्याचे पाणी नळाला येत नाही यदाकदाचित आले तर यागरभर पाणीच आठ दिवसाला एकदा येते. उर्वरित पाण्यासाठी नागरिकांना कामधंदा सोडून घोटभर पाण्यासाठी दिवसभर वणवण भटकावे लागत आहे. पाण्याचा टँकर तातडीने सुरू करून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावावा. असा प्रश्न नागरिकांनी ग्रामपंचायत प्रशासनाकडे उपस्थित केला असता ? पिण्याचे पाणी जमिनीत आहे की नाही याची चाचपणी करण्यासाठी आम्हाला पाणाड्या कुठे मिळेना पाणी बघणारा चांगला गॅरंटीबाज पाणाड्या मिळाला की आम्ही लगेच बोअरवेल

चिखलीच्या ग्रामसभेत झाला भलताच राडा

येऊन पिण्याच्या पाण्याची सोय तातडीने करतो असे ग्रामपंचायत प्रशासनाकडून थेट उत्तर देताच ग्रामसभेत नागरिकांनी एकच गोंधळ घातला. यामुळे काही वेळ सभा तहकूब करण्यात आली. एवढेच नव्हे तर गावात ज्या काय योजनेतून विकासाची कामे झाली आहेत किंवा होण्याच्या मार्गावर आहेत त्या कामाच्या ठिकाणी काम कोणत्या योजनेतून मंजुर झाले आहे त्यासाठी किती निधी उपलब्ध झाला आहे. याचा कोठे उल्लेख असलेला फलक लावण्यात आलेला नाही उल्लेख असणारा फलक तातडीने लावण्यात यावा. यासह अन्य प्रश्न नागरिकांनी उपस्थित करून ग्रामपंचायत प्रशासनाचे लक्ष वेधले. यावेळी सरपंच, सदस्य ग्रामविकास अधिकारी, पदाधिकारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महत्त्वाचे वृत्त

सहकलाकारांना शस्त्राचा धाक दाखवून लुटले

पुणे : चित्रिकरणासाठी निघालेल्या चौघा सहकलाकारांना शस्त्राचा धाक दाखवून त्यांना लुटण्यात आल्याची घटना बी. टी. कवडे रस्त्यावर घडली. याबाबत इम्रान खान (वय २१, रा. सय्यदनगर, महंमदवाडी रस्ता, हडपसर) याने या संदर्भात वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. खान आणि त्याचे सहकारी हर्ष नाथे, जिशान पटणी चित्रीकरणासाठी मुंबईला निघाले होते. पहाटे चारच्या सुमारास ते बी. टी. कवडे रस्त्यावर बसची वाट पाहत थांबले होते. तेथील एका टपरीवर ते चहा प्यायला थांबले होते. त्यावेळी एक जण तेथे आला. त्याच्याबरोबर साथीदारही होते.

मुंबईतील राजकीय भूखंडांना चाप

मुंबई : मुंबई महापालिकेच्या उत्पन्नात भर पडावी आणि मालमत्तांचे रक्षण व्हावे, या उद्देशाने महापालिकेने मोकळ्या जागांच्या धोरणाचा मसुदा तयार करण्याचे काम सुरू केले आहे. मात्र, राजकीय नेत्यांना दिलेल्या व क्लब किंवा अन्य व्यावसायिक वापर सुरू असलेल्या भूखंडांबाबत कोणता निर्णय घ्यायचा, याबाबत पालिकेसमोर आव्हान आहे. मुंबईतील बदलती राजकीय समीकरणे पाहता, नव्या धोरणात प्रस्थापितांना धक्का बसण्याची शक्यता आहे. या भूखंडावर विनामूल्य प्रवेश मिळणार का, पालिकेच्या उत्पन्नात वाढ होणार का, भूखंड वापर नियमावली अधिक कठोर करणार का, असे प्रश्न उपस्थित झाले आहेत.

अर्थसंकल्पात ३३३ कोटींची बनवाबनवी

नाशिक : महापालिकेच्या चालू वर्षाच्या अंदाजपत्रकात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत रस्ते, पूल व सांडवे बांधण्याच्या कामांचे दायित्व ३३३ कोटींनी कमी दर्शवून महापालिकेची फसवणूक करण्यात आल्याचा आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे महानगरप्रमुख सुधाकर बडगुजर यांनी केला आहे. मंजूर कामांच्या कार्यादेशाची मुदत मार्च २०२४ पूर्वी संपुष्टात येत असताना परस्पर दायित्व कमी दर्शवून नवीन कामांच्या निविदा काढण्यासाठी केलेली ही कृती असून, आर्थिक भ्रष्टाचार करण्याच्या उद्देशाने हा अर्थसंकल्प तयार केल्याचा गंभीर आरोप करीत दोषींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी आयुक्तांकडे केली आहे.

सूर्यग्रहण पाहिलं : दिला गोंडस 'राजनंदिनी' ला जन्म

सांगली : गरोदर असणाऱ्या विवाहितेने थेट सूर्यग्रहण पाहिले. खरंतर गरोदर महिलेने सूर्यग्रहण पाहणे अशुभ मानले जाते. मात्र समाजातल्या रूढी परंपरांना छेद देऊन इस्लामपूरच्या नवेखेड येथील पूजा ऋषीराज जाधव यांनी सूर्यग्रहण पाहिला आणि आता तिने गोंडस बाळाला जन्म दिला आहे. इस्लामपूरच्या नवेखेड येथील या महिलेने अंधश्रध्दांना छेद देण्याचे काम करून दाखवले आहे. २५ ऑक्टोबर २०२२ रोजी सूर्यग्रहण होते आणि चार महिन्याची गरोदर असणारे पूजा जाधव येणे थेट सूर्यग्रहण पाहण्याचा निश्चय केला. घराच्या गच्चीवर जाऊन पूजाने आपल्या पती आणि कुटुंबासमवेत सूर्यग्रहण पाहिले आणि अंधश्रध्देबाबत असणारा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला.

इतिहासाची साक्ष देणारा खजिना सापडला

सातारा : गुरुवार बागेच्या परिसरातील तक्ताचा वाडा येथे सतराव्या शतकातील ऐतिहासिक रांजण आढळून आला आहे . त्यामुळे नगरपालिकेने गुरुवार बाग परिसरातील समाज मंदिराचे काम तात्काळ थांबवावे अशा स्पष्ट सूचना खासदार उदयनराजे भोसले यांनी दिले आहेत. तख्ताचा वाडा परिसरातील ऐतिहासिक ठेवा वाचवण्याकरता या समाज मंदिराला परवानगी देण्यात येऊ नये अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा साताऱ्यातील इतिहास प्रेमींनी तसेच माजी उपनगराध्यक्ष सुहासराजे शिर्के व अरबाझ शेख यांनी दिला आहे .

वारणा नदीत बुडून दोघा मावसभावांचा मृत्यू

सांगली : पोहता येत नसताना उन्हाच्या काहिलीपासून बचाव करण्यासाठी वारणा नदीत उतरलेल्या दोन शाळकरी मुलांचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी सकाळी तांदुळवाडी (ता. वाळवा) येथे उघडकीस आली. अमोल प्रकाश सुतार (वय १६) व रविराज उत्तम सुतार (वय १२) अशी त्यांची नावे आहेत. आज सकाळी पुन्हा मुलांचा शोध बचाव पथकामार्फत सुरू करण्यात आला. यावेळी बचाव पथकाला मालेवाडी जॅकवेल नजीक दोन्ही मुलांचे मृतदेह आढळून आले.

भाजपा मंत्री महिनाभर व्यस्त

छत्रपती संभाजीनगर : प्रत्येक विधानसभेत राजकीय वलयांकित चेहऱ्याशिवाय समाज जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या व्यक्तींबरोबरच बुध्दीवंतांचे संमेलने, व्यापारी संमेलने, ज्येष्ठ कार्यकर्त्यांचे एकत्रिकरण तसेच दुचाकी फेरी, योग शिबिरे अशी विविध प्रकारच्या कामे हाती घ्या आणि पुढील ३० दिवस पक्ष कामाशिवाय अन्य कोणतेही मोठे काम हाती घेऊ नका, अशा सूचना केंद्रीय पातळीवरुन भाजपच्या मंत्र्यांना देण्यात आल्या आहेत. मोदी सरकारला नऊ वर्षे पूर्ण होत असल्याचा उत्सव भाजपच्या कार्यकर्त्यांनी अधिक जोमाने साजरा करण्याची तयारी केली जात आहे. त्यातून पुढील निवडणुकींची बांधणी केली जात आहे. मोदी सरकारच्या काळात झालेल्या विकास प्रकल्पास मतदारांना आवर्जून येऊन जावे, असे सांगण्यात आले असून 'विकासतीर्थास भेटी' असे या उपक्रमास संबोधण्यात आले आहे.

मित्राची मस्करी महागात पडली

पिंपरी : गेल्या काही दिवसांपासून खुनाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. चिखली येथील खुनाची घटना ताजी असतानाच भोसरी परिसरात मस्करीमध्ये मित्राच्या खिशातला मोबाईल काढल्याच्या कारणावरून एका तरुणाची डोक्यात दगड घालून हत्या केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेने भोसरी परिसरात एकच खळबळ उडाली आहे. नारायण वसंत वाघमारे असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी घटनेची दखल घेत अमर ऊर्फ एकक्या गौतम कसबे (वय वर्षे २४) याला ताब्यात घेतले आहे.

वेगवेगळ्या घटनांमध्ये तिघांचा बुडून मृत्यु

जळगाव : जिल्ह्यात वेगवेगळ्या घटनांमध्ये तीन तरुणांचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. भुसावळ नदीपात्रात दोन मुलांचा, तर जळगावनजीक गिरणा नदीपात्रात एका तरुणाचा बुडून मृत्यू झाला. या संदर्भात पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. सध्या तापमानाने उच्चांकी पातळी गाठली आहे. त्यामुळे अनेक जण नदीपात्रात पोहण्यासाठी जात असल्याचे चित्र आहे. भुसावळ शहरातील तापी नदीपात्रात दोन मुलांचा बुडून मृत्यू झाला. दानिश शेख जब्बार (१७) व अंकुश ठाकूर (१७, दोघे रा. खोली, खडका रोड, भुसावळ) अशी मृत मुलांची नावे आहेत. तापी नदीवरील जुन्या पुलाच्या भागात जलसाठा असल्याने खडका रोड भागातील काही तरुण तेथे पोहण्यासाठी गेले होते.

आरोपीकडे मिळाली तीन पिस्तूल आणि काडतुसे

पिंपरी-चिंचवड : पोलीस आयुक्तालयातील खंडणी विरोधी पथकाने सुनील बाळासाहेब खेंगरे आणि अभिजीत अशोक घेवारे यांना बेड्या ठोकल्या आहेत. आरोपीकडून एक लाख वीस हजार सहाशे रुपयांचे तीन देशी बनावटीचे पिस्तुले आणि तीन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आले आहेत. काळेवाडी परिसरात सराईत गुन्हेगार आले असल्याची माहिती खंडणी विरोधी पथकाचे कर्मचारी आशिष बोडके आणि प्रदीप गोडांबे यांना मिळाली. त्या ठिकाणाहून आरोपी खेंगरे आणि घेवारे यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून देशी बनावटीचे पिस्तुलं आणि जिवंत काडतुसे आढळले आहे.

नानांची विकेट जाणार, थोरातही पदावरून हटणार

नवीन प्रदेशाध्यक्ष ठरला, काँग्रेसचा प्लॅन तयार

सुराज्य/मुंबई

आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र काँग्रेसमध्ये लवकरच मोठे फेरबदल होण्याची शक्यता आहे. नाना पटोले यांना पक्षांतर्गत विरोध वाढल्यानंतर त्यांच्याकडून प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी काढून घेतली जाणार असल्याचे समजते. तसंच काँग्रेसच्या विधीमंडळ पक्षाचे गटनेते बाळासाहेब थोरात यांनीही आपण गटनेतेपदावर राहण्यास इच्छुक नसल्याचं पक्षश्रेष्ठींना कळवल्याने त्यांच्या जागी लवकरच नवा गटनेता नेमला जाणार असल्याची माहिती आहे.

कर्नाटक विधानसभा निवडणुकींच्या निकालानंतर महाराष्ट्रातही सत्तांतर होणार असल्याचा दावा राज्यातील काँग्रेस नेत्यांकडून केला जात आहे. मात्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या कार्यशैलीमुळे पक्षातील काही नेत्यांमध्ये प्रचंड असंतोष असून तो आता उघडपणे बाहेर येऊ लागला आहे. काही महिन्यांपूर्वी ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि राहुल गांधी यांच्याकडे पटोले यांची तक्रार केली होती. त्यानंतर आता विदर्भातील काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, सुनील केदार आणि शिवाजीराव मोघे हे नेते पटोलेंना पदावरून हटवावं, या मागणीसाठी दिल्लीत तळ ठोकून आहेत. त्यामुळे पटोले यांच्या जागी सर्वांना मान्य असेल आणि आगामी निवडणुकांच्या दृष्टीने नेते आणि पदाधिकाऱ्यांना जोडून ठेवू शकेल, असं नेतृत्व महाराष्ट्र काँग्रेसला देण्यासाठी पक्षश्रेष्ठींकडून हालचाली सुरू असल्याचं बोललं जात आहे.

प्रदेशाध्यक्षपदाच्या स्पर्धेत कोण आहे आघाडीवर?

महाराष्ट्रात काँग्रेसचे विविध जिल्ह्यांमध्ये अनेक मातब्बर नेते आहेत. त्यामुळे नव्या प्रदेशाध्यक्षाची निवड करताना पक्षनेतृत्वाला तारेवरची कसरत करावी लागणार आहे. प्रदेशाध्यक्षपदासाठी चर्चेत असणाऱ्या नेत्यांमध्ये माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, सतेज पाटील, सुनील केदार, यशोमती ठाकूर यांच्या नावाचा समावेश आहे. मात्र, या स्पर्धेत सध्यातरी यशोमती ठाकूर या सगळ्यात पुढे असल्याचे समजते. स्थानिक राजकारणावर पकड आणि प्रदेश पातळीवरील कामाचा अनुभव या यशोमती ठाकूर यांच्या जमेच्या बाजू आहेत. नुकत्याच झालेल्या बाजार समितीच्या निवडणुकीतही यशोमती ठाकूर यांनी अमरावतीत काँग्रेसचा विजयी झेंडा फडकवला होता.

महाराष्ट्र काँग्रेसला नवे प्रभारी मिळणार

लोकसभा आणि विधानसभा निवडणुका जवळ आल्याने राज्य आणि केंद्रीय पातळीवरील नेत्यांमध्ये समन्वय राखण्याच्या दृष्टीने राज्य प्रभारीपदाचं महत्वही वाढलं आहे. अशातच काँग्रेसचे सध्याचे महाराष्ट्र प्रभारी एच. के. पाटील हे आपल्या पदाचा राजीनामा देतील, अशी शक्यता आहे. कारण कर्नाटक विधानसभा निवडणुकीत पाटील हे आमदार म्हणून निवडून आले असून त्यांचा राज्य मंत्रिमंडळातही समावेश केला जाण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर केरळमधील रमेश चेन्निथला यांची महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी म्हणून निवड होऊ शकते.

बैलगाडा मालकाचा नादच खुळा

चक्क फॉर्च्युनर गाडीतून आणली घोडी

सुराज्य/शिरूर

शिरूर तालुक्यातील ढोक सांगवी गावच्या एका हौशी तरुणाने पाच महिन्यांची एक घोडी २५ हजाराला विकत घेतली. त्या घोडीला चक्क महागड्या असणाऱ्या फॉर्च्युनर कारमधून आणले आहे. या घटनेचा व्हिडिओ सद्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

उत्तर पुणे जिल्ह्यात बैलगाडा शर्यतीला अनन्यसाधारण महत्व आहे. त्यामुळे बैलांची देखील तेवढीच काळजी घेतली जाते. मात्र बैलाबरोबरच घोडीला देखील त्याच्या बरोबरीने महत्त्व आहे. बैलगाड्या पुढे पळताना घोडीला ठेवावेच लागते. कारण बैलांना रस्ता दाखवण्यासाठी आणि बैलांपेक्षा घोडीचा वेग अधिक असतो. त्यामुळे घोडीचा देखील शर्यतीत मोठा उपयोग होत असतो.

ढोक सांगवी येथील किरण दगडू पाचांगे यांनी अहमदनगर जिल्ह्यातून एक पाच महिन्यांची असलेली घोडी विकत घेतली. पांचागे हे बैलगाडा शौकीन आहेत. त्यांचा स्वतःचा बैलगाडा देखील आहे. त्यामुळे गाड्यांच्या पुढे धावण्यासाठी ही घोडी विकत घेतल्याचे पाचंगे यांनी सांगितले आहे. बैलापुढे घोडी पळण्याच्या दोन्ही बैलांना चाव-हेकरी म्हणतात. या बैलगाड्या पुढे बैलांना दिशा देण्याचं काम घोडी करत असते. ही घोडी खूप चपळ असावी असं प्रत्येकाला वाटत असतं. घोडीमुळेच बैल शर्यती जिंकतो असे अनेकांचे मत आहे. त्यामुळे अशी घोडी आपल्याकडे असावी असे प्रत्येक बैलगाडा मालकाला वाटत असते. याच नादातून धोक संगवीच्या बैलगाडा मालकाने ही घोडी आणली आहे. हे घोडीचं लहान शिंगरू (पिल्लू) आणून त्याची लहानपनापासून काळजी घेत तिला शर्यतीसाठी तयार केलं जातं. या परिसरात घाटात पळणाऱ्या बैलांना जशी लाखांची किंमत मिळते, तशीच घोडीला सुध्दा लाखो रुपयांची किंमत मिळते. मात्र त्यांनी फॉर्च्युनर गाडीतून तिला आणल्याने तिची सोशल मीडियावर चांगलीच चर्चा होऊ लागली आहे.

कर्नाटकात मंत्रिमंडळाचा विस्तार, या २४ मंत्र्यांनी घेतली शपथ

मंत्रिमंडळ विस्तारात कुणाला संधी?

कर्नाटकात काँग्रेसच्या २४ आमदारांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. यामध्ये दिनेश गुंडुराव, शरणबसप्पा दर्शनापुर, एचके पाटील, कृष्णा बायरे गौडा, एन चेलुवरायस्वामी, के. वेंकटेश, शिवानंद पाटील, तिम्मापुर रामप्पा बलप्पा, एसएस मल्लिकार्जुन, तंगदगी शिवराज संगप्पा, डॉ. एचसी महादेवप्पा, ईश्वर खांद्रे, क्याथासंद्रा एन राजन्ना, डॉक्टर शरणप्रकाश रुद्रप्पा पाटील, संतोष एस लाड, एनएस बोस राजू, सुरेश बीएस, मधु बंगारप्पा, डॉक्टर एमसी सुधाकर, मंकल वैद्य, लक्ष्मी आर हेब्बाळकर, रहीम खान, डी. सुधाकर आणि बी नागेंद्र यांचा समावेश आहे. राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार झाला असून आज ज्या २४ मंत्र्यांना पदाची शपथ देण्यात आली. त्यामध्ये ६लिंगायत, ४ वोक्कलिगा, ३ अनुसूचित जाती, २ अनुसूचित जमाती आणि ५ कुरुबा, राजू, मराठा आणि मोगवीरा आदी समाजातील आहेत.

सुराज्य/नवी दिल्ली

कर्नाटकात सिध्दरामय्या सरकारच्या पहिल्या मंत्रिमंडळाचा विस्तार पार पडला आहे. सिध्दरामय्या यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर कर्नाटकात आता नवे मंत्री तयार करण्यात आले आहेत. यावेळी २४ मंत्र्यांनी या मंत्रिमंडळाच्या विस्तारात शपथ घेतली आहे. आता राज्य मंत्रिमंडळात एकूण ३४ मंत्री आहेत.

२० मे रोजी मुख्यमंत्री सिध्दरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांच्यासह १० मंत्र्यांचा शपथविधी झाला होता. या सोहळ्याला प्रचंड गर्दी झाली होती.

त्यामुळे सुरक्षाव्यवस्था वाढवण्यात आली होती. काँग्रेसचे नेते एचके पाटील, कृष्णा बायरे गौडा यांनी मंत्रीपदाची तसेच गोपनीयतेची शपथ घेतली. तसेच त्यांच्यासोबत इतर २२ जणांनी देखील मंत्रीपदाची शपथ घेतली.

मी पाटीलच लावणार; गौतमीचे प्रत्युत्तर

सुराज्य/मुंबई : गेल्या काही महिन्यांपासून गौतमी पाटीलची जोरदार चर्चा सुरु आहे. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या व्हिडीओमुळे ती प्रचंड प्रमाणात चर्चेत असते. यावेळी गौतमी आडनावावरून पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. गौतमीने 'पाटील' आडनाव बदलून घ्यावं अन्यथा तिचे महाराष्ट्रात कार्यक्रम होऊ देणार नाही, अशी भूमिका एका मराठा संघटनेने घेतली.

दरम्यान, माझं आडनाव जर पाटील आहे, तर मी पाटीलच लावणार ना?, असं म्हणत गौतमी पाटीलनं तिच्या कार्यक्रमावर आक्षेप घेणाऱ्यांनाही जाहीर आव्हान दिलं आहे. एका कार्यक्रमानंतर गौतमी पाटीलला प्रसार माध्यमांनी विचारलं असता तिनं सडेतोड उत्तर दिलं. माझं आडनाव जर पाटील आहे, तर मी पाटीलच लावणार ना? असा प्रतिप्रश्नच गौतमी पाटीलनं केला आहे.

बच्चू कडूंचा महायुतीवर प्रहार

विधानसभेसह लोकसभेवरही दावा

सुराज्य/अमरावती

प्रहार जनशक्ती पार्टीचे आमदार बच्चू कडू यांनी विधानसभेसह लोकसभा निवडणूक लढवण्याची तयारी सुरु केली आहे. प्रहार जनशक्ती पार्टी विधानसभेच्या १५ ते २० जागा लढवणार आहे. लोकसभेसाठी अमरावती मतदारसंघावर बच्चू कडू यांनी दावा केला आहे. त्यासाठी तयारी सुरु केल्याचे बच्चू कडू यांनी सांगितले आहे.

आमदार बच्चू कडू यांना नुकताच मंत्रीपदाचा दर्जा मिळाला आहे. नागपूर येथे बोलताना आमदार कडू यांनी लोकसभा आणि विधानसभा निवडणूक लढवणार असल्याचे संकेत दिले. आम्ही शिंदे-फडणवीस सरकारमध्ये घटक पक्ष आहोत. मेळघाटामध्ये आमदार राजकुमार पटेल आहेत. मी अचलपूरचा आमदार आहे. त्यामुळे अमरावतीची लोकसभेची जागा आमच्यासाठी सोडावी, अशी मागणी आम्ही करणार आहोत, असे बच्चू कडू यांनी सांगितले. 'अमरावतीत दोन, अकोल्यात दोन, वाशिम, नागपूर, नाशिक, सोलापूरमध्ये एक अशा १५ ते २० जागांसाठी बच्चू कडू आग्रही आहेत. तूर्त तरी आगामी निवडणुका भाजप, शिवसेना आणि प्रहार जनशक्ती एकत्र लढणार आहोत. पुढे काही वेगळा विचार ठरला तर तसा निर्णय घेतला जाईल', असे बच्चू कडू यांनी स्पष्ट केले.

भाजपची ७३ विधानसभा मतदारसंघांत अन्यपक्षीय उमेदवारांवर भिस्त

सुराज्य/मुंबई

भाजपने राज्यात लोकसभेबरोबरच स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभा निवडणुकींचीही तयारी सुरू केली आहे. भाजपकडे विधानसभेसाठी १६५ तगडे उमेदवार असून शिवसेना (शिंदे गट) आणि अपक्ष असे ५० आमदार गृहीत धरल्यास भाजपला ७३ मतदारसंघांसाठी मातब्बर नेत्यांची गरज भासणार आहे. त्यादृष्टीने वरिष्ठ नेत्यांशी त्यांच्याबरोबर चाचपणी व बोलणी सुरू आहेत, असे पक्षातील ज्येष्ठ नेत्यांनी सांगितले.

राज्यात विधानसभेच्या २८८ जागा असून त्यापैकी १६५ जागांवर विद्यमान आमदार आणि पक्षातील अन्य नेत्यांचा जिंकण्याची शक्यता गृहीत धरून विचार होऊ शकतो. तर शिंदे गटातील आमदार व अपक्ष आमदार अशा ५० जागा आहेत. उर्वरित ७३ जागांवर भाजपकडे योग्य उमेदवार नाहीत किंवा पक्षाची निवडणूक जिंकण्याची ताकद नाही, असे पक्षाकडून सुरू असलेल्या सर्वेक्षणात आढळून आले आहे. त्यामुळे या मतदारसंघात अन्य पक्षातील मातब्बर नेत्यांना भाजपबरोबर आणण्यावर पक्षाची भिस्त असणार आहे. भाजप आणि शिंदे गटाबरोबर जागावाटप झाले नसले तरी उद्धव ठाकरे बरोबर असताना जेवढ्या जागा दिल्या होत्या, तेवढ्या जागा दिल्या जाणार नाहीत. अन्य घटकपक्षांचा विचार करता जास्तीत जास्त ७०-८० जागा दिल्या जाऊ शकतील. लोकसभा निवडणुका झाल्यावर आणि केंद्रात पुन्हा मोदी सरकार आल्यावर भाजपमध्ये येऊ इच्छिणाऱ्या नेत्यांची संख्या वाढेल. तेव्हा ७३ मतदारसंघाचा विचार करून अन्य पक्षातील नेत्यांना भाजपमध्ये किंवा गरजेनुसार शिंदे गटात प्रवेश देण्यावर विचार होईल आणि त्यादृष्टीने शोध सुरू आहे, असे पक्षातील सूत्रांनी सांगितले.

राजकारण्यांकडून जनतेचा खेळखंडोबा सुरु

संभाजीराजे छत्रपतींचा हल्लाबोल

सुराज्य/मुंबई

राज्यस्तरीय अधिवेशनात स्वराज्य संघटनेचा ठराव मंजूर करण्यात आला आहे. पुण्यात स्वराज्य संघटनेचं पहिलं राज्यस्तरिय अधिवेशन पार पडलं. तसेच संभाजीराजेंच्या स्वराज्य भवनाचं लोकार्पण करण्यात आलं. यावेळी छत्रपती संभाजीराजे म्हणाले की, 'मला प्रस्थापित लोकांबाबत विरोध नाहीये. पण जे काही प्रस्थापित लोकं माजलेले आहेत. त्यांच्याबद्दल मला विरोध आहे. पण चूक त्या प्रस्थापित लोकांची नाहीये. तर चूक आपली आहे. कारण आपण त्या सगळ्यांना निवडून देतोय. राज्यातील राजकारण्यांकडून जनतेचा खेळखंडोबा सुरू आहे, असा हल्लाबोल माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी केला आहे.'

माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी जनतेशी संवाद साधताना राज्यातील राजकारणांवर निशाणा साधला आहे. माझ्या स्वराज्यातील लोकांना सांगायचं आहे की, जी आपली जनता आहे. जी आपली रयत मतदान करत आहे. पण यांना मला सांगायचं आहे की, आता यापुढे या सर्व गोष्टी चालणार नाहीत. हे आपला खेळ करायला लागलेत.

या राजकारण्यांची तीच चर्चा आणि तेच खोटं बोलणं सुरू असतं. ही आपल्या महाराष्ट्राची संस्कृती आहे का?, असा सवाल संभाजीराजे छत्रपती यांनी उपस्थित केला आहे.

वेळ प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले आणि आंबेडकरांचं नाव येतात. तसेच वेळ प्रसंगी महासंतांचं नाव येतात आणि खेळखंडोबा करून आपल्याला खुळ्यात काढतात. त्यामुळे आजही वेळ गेलेली नाही. या स्वराज्याच्या माध्यमातून आपल्याला जनजागृती करून सामान्य, कष्टकरी आणि शेतकऱ्यांना ताकद देण्यासाठी आपण बाहेर पडायचं आहे. त्यामुळे हे अधिवेशन त्याच्यासाठीच आहे, असंही संभाजीराजे छत्रपती म्हणाले.

'स्वराज्य म्हणजे काय? स्व म्हणजे तुम्ही (डॉक्टर, कामगार, विद्यार्थी, शिक्षक, इतिहासकार, शेतकरी) हे राज्य तुमचं आहे. हे स्वराज्य असचं पुढे चालू ठेवायचं का?, यासाठी आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे. आपण अनेक इतिहासकारांचे विचार सांगतो. पण हे राजकारणातली लोकं हा विचार येऊन चालतात का, हा एक प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. त्यामुळे स्वराज्याने पुढकार येणं महत्त्वाचं आहे, असं संभाजीराजे छत्रपती म्हणाले.'

Temple of Democracy

''राजधानी नवी दिल्ली इथं संसदेची भव्य अशी नवी इमारत बांधण्यात आली आहे. या नव्या संसद भवनाचा लोकापर्ण सोहळा रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. संसद आणि विधान भवनातील सभागृहांना लोकशाहीचे मंदिर (टेम्पल ऑफ डेमोक्रशी) मानले जाते.२०१४मध्ये प्रथमच केंद्रात सत्ता आल्यानंतर मोदी यांनी संसदेच्या पहिल्या पायरीवर माथा टेकवून संसदेत प्रवेश केला.संसद भवन लोकशाहीचे मंदिर असून इथे आपल्याला लोकांची सेवा करायची आहे,असे स्पष्टीकरण त्यांनी लोकशाहीचे मंदिर याविषयीची व्याख्या सांगताना दिले.मोदी पायरीवर नतमस्तक झाले.त्यांच्याच कारकिर्दीत हे भव्य-दिव्य मंदिर उभे रहावे हा एक विलक्षण योगायोगच म्हणावा लागेल.संसद भवनाचे नवे रूप पाहून देशवासियांचा उर भरून आला आहे पण विरोधकांनी अखेर जो गोंधळ घालायचा तो घातलाच.एका चांगल्या सोहळ्याला नाट लावण्याचा उद्योग त्यांनी केला.नसत्या हरकती घेतल्या.पहिल्यांदा स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर यांच्या जयंती दिनी हा सोहळा नको म्हणून विरोधकांनी ओरड केली. विरोधकांचे हसे झाले.त्यांनी दुसरी टूम शोधली.राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते का नको? दलितांचा वापर केवळ राजकारणासाठी करणार काय? असा प्रश्न उपस्थित करून विरोधकांनी देशाचे दुसरीकडे लक्ष वेधले.कोर्टात गेल्यानंतर आपल्यासारखा निर्णय होतो,असा समज विरोधकांचा झाला आहे.मोदींच्या हस्ते नको,राष्ट्रपतींच्या हस्ते उद्घाटन व्हायला हवे,अशी मागणी घेत न्यायालयात धाव घेतली.तिथेही विरोधक तोंडावर आपटले.न्यायालयाने घटनेनुसार जो द्यायचा तो धडा दिला.येत्या पावसाळी अधिवेशनापासून हे नवे संसद भवन देशासाठी खुले होणार आहे.जुने भवन आणि नवे संसद भवन याविषयीचा हा परामर्ष''

जुन्या भवनाचे वैभव...

जुन्या भवनाचे वैभव अनेक शब्दांमध्ये सांगता येईल.स्वातंत्र्य मिळण्या अगोदर ही इमारत उभी राहिली. १९१२-१३ साली ब्रिटीश वास्तुकार हर्बट ब्रेकर यांनी या वर्तुळकार इमारतीची रचना केली. इमारतीच्या बाह्य वर्तुळकार गच्छीस २५७ ग्रेनाइट स्तंभांचा आधार आहे. संसद भवन दिल्लीला जनपथ वरील राष्ट्रपतीभवन जवळ आहे. घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा संसद भवनासमोर उभारण्यात आला आहे. हा पुतळा बी.व्ही. वाघ यांनी बनवलेला असून २ एप्रिल १९६७ रोजी भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते त्याचे अनावरण झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीने हा पुतळा भेट दिला आहे.

नव्या भवनाचे अफाट रूप...

१० डिसेंबर २०२० रोजी मोदी यांनी नव्या संसद भवनाचे भूमीपूजन केले. देशाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त नव्या संसद भवनातून दोन्ही सभागृहांचे कामकाज सुरु केले जाणार आहे. या इमारतीचे बांधकाम २०२२ सालापर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा होती. दिल्लीमध्ये राष्ट्रपती भवन, संसद भवन, नॉर्थ ब्लॉक, साऊथ ब्लॉक, इंडिया गेट व इतर अभिलेखागार कार्यालये ज्या क्षेत्रामध्ये आहे, त्या क्षेत्रास संयुक्तपणे सेंटल विस्टा असे म्हणतात. संसदेची इमारत बांधण्यासंबंधी प्रकल्प म्हणजे सेंट्रल विस्टा प्रोजेक्ट होय.



थोडक्यात पण महत्त्वाचे...

- नवीन संसद भवनाची क्षमता लोकसभेत ८८८ आणि राज्यसभेत ३८४ असेल. नवीन संसद भवनात संयुक्त अधिवेशन झाल्यास लोकसभेला १२७२ सदस्य बसू शकतील. संसदेच्या नवीन इमारतीच्या इतर भागांमध्ये मंत्री आणि समित्यांची कार्यालये असलेले चार मजले असतील.

- नवीन संसदेची इमारत त्रिकोणी आकारात आहे जेणेकरून जास्तीत जास्त जागेचा वापर करता येईल.

- नवीन इमारत असूनही, जुन्या आणि नवीन दोन्ही संसदेच्या इमारती एकत्रितपणे काम करतील. त्यामुळे विधिमंडळाचे कामकाज सुरळीतपणे चालेल. नवीन लोकसभेची इमारत सध्याच्या इमारतीपेक्षा तिप्पट मोठी आहे. नवीन इमारत राष्ट्रीय पक्षी 'पीकॉक थीम'वर आधारित आहे.

- नवीन राज्यसभेची इमारत 'कमळ' थीम, राष्ट्रीय पुष्पावर आधारित आहे. सुधारित संसद भवन बांधकाम मूल्य साखळीत आर्थिक पुनरुज्जीवनासाठी योगदान देईल. यामुळे कुशल, अर्धकुशल आणि कामगारांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होतील.

- नवीन संसदेच्या ग्रंथालयात जागतिक दर्जाचे आणि अत्याधुनिक श्रेष्ठ ग्रंथालय असेल जे सदस्यांना संग्रहित सामग्रीमधून माहिती गोळा करण्यास अनुमती देईल. दिव्यांग किंवा दिव्यांग लोकांच्या गतिशीलतेची चिंता लक्षात घेऊन, नवीन संसद भवन १०० टक्के दिव्यांगांसाठी अनुकूल इमारत असेल.

- बांधकामादरम्यान, अंदाजे २४,०४,०९५ मनुष्य दिवसांचा रोजगार निर्माण झाला. नवीन संसद भवन बांधण्यासाठी एकूण २६,०४५ मेट्रिक टन स्टीलचा वापर करण्यात आला.नवीन संसद भवनात ६३,८०७ मेट्रिक टन सिमेंट आणि ९६८९ घनमीटर फ्लाय ॲश वापरण्यात आली.

- **नवीन संसद भवन का बांधण्यात आले?**

सध्याचे संसद भवन हे पूर्वीचे 'कौन्सिल ऑफ हाऊस' आहे आणि ते १९२७ मध्ये बांधण्यात आले होते. विविध घटनादुरुस्तींनंतर, संसदेचे सध्याचे संख्याबळ ५५२ आहे. मात्र, आगामी काळात अधिक प्रतिनिधीत्वाची गरज पाहता, मोठ्या जागेची गरज वाढेल. या व्यतिरिक्त वाढत्या लोकसंख्येमुळे संसदेतील सदस्यांना अधिक प्रतिनिधीत्व मिळावे. शिवाय, सध्याची संसद भवन अत्यंत तणावग्रस्त आहे. नवीन संसदेची इमारत भारताच्या विधानसभेच्या सुरळीत कामकाजासाठी एक मजबूत, दीर्घकाळ टिकणारी आणि भूकंप-प्रतिरोधक इमारत आहे.

नवीन संसद भवनाची वैशिष्ट्ये



क्षमता आणि क्षेत्रफळ? : नवीन इमारत त्रिकोणाकृती आहे. टाटा प्रोजेक्ट्स् लिमिटेड द्वारे इमारत बांधणी केली करण्यात आली. एचसीपी डिझाईन आणि प्लॅनिंग अँड मॅनेजमेंट प्रा.लि. ने त्याचे डिझाइन तयार केले आहे. चार मजली इमारत असून लोकसभेत खासदारांसाठी सुमारे ८८८ आणि राज्यसभा खासदारांसाठी सुमारे ३२६ पेक्षा जास्त सीट्स असणार आहेत. पार्लमेंट हॉलमध्ये एकूण १ हजार २२४ सदस्य एकाच वेळी बसू शकतील, अशी क्षमता असेल. भविष्यात दोन्ही सभागृहांची वाढीव संख्या लक्षात ठेवून नव्या सभागृहाची रचना करण्यात आली आहे. क्षेत्रफळ ६४ हजार ५०० चौरस मीटर असून १६ हजार ९२१ चौ.मी. अंडरगाऊंड असेल.

नवीन संसद भवनासाठी किती खर्च? : ९७१ कोटी खर्च बांधकामावर झाल्याचा अंदाज आहे. केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाने संसदेची नवीन इमारत बांधण्यासाठीची नोडल एजन्सी म्हणून काम पाहिले. भारताचा लोकशाही वारसा प्रदर्शित करण्यासाठी 'संविधान सभागृह', संसद सदस्यासाठी लाऊंज सभागृह, ग्रंथालय, अनेक समित्यांच्या खोल्या, भोजनगृहे या इमारतीत राहणार असून वाहने उभे करण्यासाठी पुरेशी जागाही ठेवण्यात आली आहे. हे नवीन भवन आत्मनिर्भर भारताचे उदाहरण असेल ते पूर्णपणे भारतीय नागरिक तयार करेल,असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

सध्याचे संसद भवन : पायाभरणी : १२ फेब्रुवारी १९२१, द ड्यूक ऑफ कॅनॉट, बांधकाम पूर्ण : १९२७, खर्च : ८३ लाख रुपये, उद्घाटन : १८ जानेवारी १९२७, लॉर्ड आयर्विन, आकार : वर्तुळाकार आसनक्षमता : लोकसभा - ५५२, राज्यसभा - २५०. भारताच्या विद्यमान संसद भवनाने १९२७ पासून राज्यसभा आणि लोकसभेचे आसन म्हणून काम केले आहे आणि पूर्ण होण्यासाठी सहा वर्षे लागली. जुनी संसद भवन भारतीय लोकशाही व्यवस्थेचे सामर्थ्य प्रकट करते, तर नवीन संसद भवन नवीन आणि स्वतंत्र भारताची आकांक्षा पुढे नेईल. तब्बल ६५,००० चौरस मीटर क्षेत्रफळात पसरलेली ही भव्य वास्तू भारताचा खरा वास्तुशिल्प चमत्कार ठरेल.या आणि अपुऱ्या पायाभूत सुविधांमुळे संसदेने सध्याच्या इमारतीला पर्याय सुचवण्यासाठी एक समिती स्थापन केली होती. सध्याची इमारत ९३ वर्षांहून अधिक जुनी असल्याने, सध्याच्या परिसरात अद्ययावत सुरक्षा उपाय आणि पायाभूत सुविधांची खात्री करता येत नाही.

व्हिस्टा प्रकल्पाचे शिल्पकार : बिमल पटेल हे सेंट्रल व्हिस्टा विकास प्रकल्पाचे शिल्पकार आहेत. अनेक दशकांचा अनुभव असलेले ते एक कुशल वास्तुविशारद आहेत. नवीन संसदेची इमारत त्रिकोणी आकाराची आहे आणि तिचे स्थान विद्यमान संसदेच्या इमारतीच्या बाजूला आहे. नवीन संसद भवनाचे आयुष्य अंदाजे १५० वर्षे असेल. भूकंप-प्रतिरोधक इमारत, नवीन संसद भारतभरातील वास्तुशिल्प रचनांचा समावेश करेल. हे भारतात प्रचलित असलेल्या लोकप्रिय स्थापत्य शैलींची संस्कृती आणि शिल्पकला प्रदर्शित करेल. येत्या काही वर्षांत संसद सदस्यांची संख्या वाढणार असल्याने, नवीन इमारत राज्यसभा आणि लोकसभेसाठी मोठ्या आसनक्षमतेची खात्री करेल. २०२६ मध्ये सीमांकनावरील फ्रीझ उठल्यानंतर, खासदारांची संख्या वाढण्याची अपेक्षा आहे.

वाद कशासाठी? : संसदेच्या नव्या इमारतीच्या उद्घाटनावरून काँग्रेस आणि भाजपामध्ये चांगलाच वाद रंगला आहे. राष्ट्रपती हे देशाचे प्रथम नागरिक आहेत. त्यामुळे या नव्या इमारतीचे उदघाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते न करता, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते व्हायला हवे, अशी भूमिका काँग्रेसने घेतली आहे. या भूमिकेनंतर भाजपाकडूनही काँग्रेसवर सडकून टीका केली जात आहे. त्यासाठी भाजपा संसदेचे ग्रंथालय आणि संसदेच्या अतिरिक्त इमारतीच्या उद्घाटन कार्यक्रमाचे उदाहरण देत आहे. काँग्रेसचे नेते संविधानातील वेगवेगळ्या अनुच्छेदांचा आधार घेत संसदेच्या नव्या इमारतीच्या उद्घाटनाचा अधिकार मोदी यांना नव्हे तर राष्ट्रपती मुर्मू यांचा आहे, असा दावा करीत आहेत. मात्र भाजपाने काँग्रेसचा हा दावा फेटाळून लावला आहे.

पवारांचे रडगाणे... : देशात नवं संसद भवन उभारण्याचा निर्णय घेत असताना, विरोधकांना विश्वासात घेणं गरजेचं असतं. परंतु विरोधकांना यावेळी विश्वासात घेण्यात आलं नाही,असे ज्येष्ठ नेते शरद पवार म्हणाले. या सोहळ्यावर बहिष्कार टाकण्यामागचे कारण त्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले आहे. विरोधकांना यावेळी विश्वासात घेण्यात आले नाही तसेच, भूमिपूजन करताना विरोधकांना विश्वासात घेतले गेले नाही. आता ही वास्तू तयार आहे. या वास्तूचे उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते व्हावं, अशी आम्ही सर्व विरोधकांची मागणी आहे. ती मागणी देखील सत्ताधाऱ्यांनी मान्य केलेली नाही.

२७० नागरिकांकडून निषेध

उद्घाटन सोहळ्यावर बहिष्कार टाकणाऱ्या विरोधकांचा देशातील २७० नागरिकांनी निषेध केला आहे. यामध्ये ८८ निवृत्त नोकरशहा, १०० प्रतिष्ठित नागरिक आणि ८२ शिक्षणतज्ज्ञांचा समावेश आहे. या लोकांनी संयुक्त निवेदन जारी करून विरोधकांवर टीका केली आहे. यामध्ये राष्ट्रीय तपास संस्थेचे (एनआयए) माजी संचालक वाय. सी. मोदी, माजी आयएएस अधिकारी आर. डी. कपूर, गोपाल कृष्ण आणि चॅटर्जी यांच्याशिवाय लिंगया विद्यापीठाचे कुलगुरू दुबे यांचा समावेश आहे.

लोकशाहीच्या भावनांना धक्का...

हा सोहळा समस्त भारतीयांसाठी अभिमानास्पद आहे. मात्र विरोधी पक्ष या निमित्ताने राजकारण करत आहे. त्यांचे पोकळ दावे आणि निराधार युक्तिवाद समजण्याच्या पलीकडे आहेत. मोदींचे कारण पुढे करत सोहळ्यावर बहिष्कार टाकणारे विरोधक उघडपणे लोकशाहीच्या भावनांना धक्का लावत आहेत, असे या मान्यवरांनी संयुक्त निवेदनात म्हटले आहे.

अनुच्छेद ६० - १११ मध्ये नेमके काय आहे?

संविधानाच्या अनुच्छेद ६० मध्ये राष्ट्रपतींच्या शपथेबद्दल सविस्तरपणे सांगण्यात आलेले आहे तसेच राष्ट्रपतींनी घ्यावयाची शपथही या अनुच्छेदात देण्यात आलेली आहे. मी देवाची शपथ घेतो की देशाच्या राष्ट्रपतीपदाची सर्व कर्तव्ये पार पाडेन. संविधानाचे संरक्षण, जतन करण्यासाठी पूर्णपणे प्रयत्न करेन. मी देशातील जनतेच्या कल्याणासाठी, सेवेसाठी स्वत:ला समर्पित करीत आहे, अशी राष्ट्रपतींनी घ्यावयाची शपथ या अनुच्छेदात नमूद करण्यात आली आहे. अनुच्छेद १११ मध्ये संसदेने कोणतेही विधेयक मंजूर केल्यानंतर त्याला राष्ट्रपतींची संमती आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. काँग्रेस सध्या गोंधळ निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. गोंधळाचा संविधानातील अनुच्छेद ६० आणि १११ शी काहीही संबंध नाही.

संकलन व संपादन : पुरुषोत्तम कुलकर्णी